सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा

Solapur Tarun Bharat

छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर शुक्रवार, दि. ०४ एप्रिल २०२५ वर्ष तिसरे अंक ०३ पाने : ८ किंमत रु. ६/-

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर

नवी दिल्ली : मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू करण्याचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर करण्यात आला. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी हा प्रस्ताव लोकसभेत सादर केला. विरोधकांच्या बाजूने आठ खासदारांनी या विषयावर त्यांची मते मांडली. विरोधकांच्या सर्व प्रश्नांना अमित शाह यांनी उत्तर दिले. लोकसभेत ४० मिनिटांच्या चर्चेअंती मतदान झाले. आवाजी मतदानाने मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर झाला.

लोकसभेत मणिपूर संदर्भात चर्चा सुरू होती त्यावेळी विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि वायनाडच्या खासदार प्रियांका गांधी वाड्रा हे दोन प्रमुख खासदार तसेच अनेक विरोधक अनुपस्थित होते. एरवी सरकारने मणिपूरवर चर्चा करावी अशी आग्रही मागणी करणारे अनेक खासदार चर्चेवेळी अनुपस्थित होते. लोकसभेत वक्फ विधेयकावर मतदान झाल्यानंतर लगेच मणिपूरवर चर्चा होणार असल्याचे सर्व खासदारांना आधीच सांगण्यात आले होते. हा कार्यक्रम महिती असूनही अनेक विरोधी खासदारांनी चर्चेवेळी गैरहजर राहणे पसंत केले.



मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीला काँग्रेसचा पाठिंबा आहे. पण मणिपूरमध्ये कायदा - सुव्यवस्था आणि शांतता नांदावी ही काँग्रेसची अपेक्षा आहे. यासाठी केंद्र सरकारच्या नेतृत्वात काम व्हायला हवे, जे मागील काही वर्षात झालेले नाही; असे काँग्रेस खासदार शशी थरुर म्हणाले. त्यांनीच विरोधकांच्यावतीने चर्चेला सुरुवात केली. काँग्रेसने मुख्यमंत्र्यांविरोधात अविश्वास प्रस्ताव तयार केला होता. पण मुख्यमंत्र्यांनी राजीनामा दिला. यानंतरच राज्यात राष्ट्रपती राजवट लागू झाली, असेही थरुर म्हणाले. पंतप्रधान मोदींनी एकदा मणिपूरचा दौरा करावा, अशीही मागणी त्यांनी केली.

मणिपूरमध्ये सरकारी शस्त्रागारातून साठ हजार शस्त्रे आणि सहा लाखांपेक्षा जास्त दारुगोळा लुटण्यात आला. राज्याच्या आर्थिक विकासाला धक्का बसला. राज्यात फक्त राष्ट्रपती राजवट लावून प्रश्न सुटणार नाही, केंद्र सरकारलाच ठोस पावलं उचलावी लागतील; असेही शशी थरुर म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी विरोधकांच्या सर्व प्रश्नांना उत्तरं दिली. मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट लागू झाल्यापासून कायदा - सुव्यवस्था नियंत्रणात आहे. मागील दोन महिन्यांपासून वटहुकुमाच्याआधारे मणिपूरमध्ये राष्ट्रपती राजवट आहे. सुरक्षा पथकांनी राज्यात परिस्थिती नियंत्रणात ठेवली आहे. जनतेचे सुरक्षा पथकांना सहकार्य लाभले आहे; यामुळे मणिपूरमधील प्रश्न लवकरच सुटतील असा विश्वास अमित शाह यांनी व्यक्त केला.

मणिपूरमध्ये वांशिक संघर्ष सुरू आहे. या संघर्षामुळे राज्याचे प्रचंड नुकसान झाले आहे. पण जेव्हा आमची सत्ता दोन्हीकडे नव्हती तेव्हाही हा संघर्ष होता. त्यावेळी तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री मणिपूरमध्ये गेले नव्हते, ही बाब नोंदवून अमित शाह यांनी केंद्र सरकारने प्रश्न सोडवण्यासाठी ठोस पावलं उचलल्याचे सांगितले. वांशिक संघर्षाशी सबंधित सर्व गटांशी चर्चा करुन तोडगा काढण्याचे प्रयत्न केंद्र सरकारने सुरू केल्याचे गृहमंत्री अमित शाह यांनी दिले. मणिपूरचे मुख्यमंत्री बिरेन सिंह यांनी ९ फेब्रुवारी रोजी राजीनामा दिला. यानंतर मणिपूरमध्ये विधानसभा विसर्जित न करता राष्ट्रपती राजवट लागू करण्यात आली आहे. कलम ३५६ नुसार राष्ट्रपती राजवट लागू केली तर दोन महिन्यांच्या आत या निर्णयाला संसदेची मंजुरी घ्यावी लागते. या तरतुदीला लक्षात ठेवून केंद्र सरकारने गुरुवार ३ एप्रिल रोजी मध्यरात्री दोन वाजता राष्ट्रपती राजवटीचा प्रस्ताव लोकसभेत मंजूर करुन घेतला.

## बँकेत मनसैनिकांनी केला राडा, सदावर्ते - राज ठाकरे आमनेसामने

मुंबई : गुढी पाडव्यानिमित्त शिवाजी पार्क येथे घेतलेल्या सभेत मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा मराठी भाषेचा मुद्दा मांडला. महाराष्ट्रात मराठीत बोललंच पाहिजे अशी आग्रही मागणी त्यांनी केली. कार्यकर्त्यांना आदेश दिला की, महाराष्ट्रातील प्रत्येक बँकेत मराठी वापरली जाते की नाही हे तपासा. कार्यकर्ते या आदेशानंतर लगेच सक्रीय झाले.

लोणावळ्यामध्ये मनसेच्या कार्यकर्त्यांनी मराठी भाषेत बोलत नाही म्हणून बँक ऑफ महाराष्ट्रच्या मॅनेजरला थोबाडीत मारली होती. या घटनेचा व्हिडीओ व्हायरल झाला. आता या घटनेवरुन वकील गुणरत्न सदावर्ते आणि मनसे आमनेसामने असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

मनसेच्या कार्यकर्त्यांनी बँकेत केलेल्या राड्यावरुन सदावर्ते यांनी मनसेवर कडाडून टीका केली. ज ठाकरे हे कायद्यापेक्षा मोठे नाहीत. त्यांची टोळकी बँकांमध्ये धुडगूस घालत आहेत. हा प्रकार थांबला पाहिजे. याबाबत मुख्यमंत्री, पोलीस महासंचालक आणि संबंधित अधिकाऱ्यांना तक्रार





अर्ज देणार असल्याचे सदावर्ते यांनी सांगितले. कायदा हाती घेणाऱ्या टोळक्यांविरोधात कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी सदावर्तेंनी केली आहे.

राजकारण म्हटले की आरोप प्रत्यारोप, शह काटशह हे आलेच. जो राजकारणात प्रत्यक्ष अप्रत्यक्षरित्या सहभागी होणार त्याला त्याच्या चांगल्या वाईट परिणामांना सामोरे जावेच लागेल. पण राजकारणासाठी कायदा हाती घेणे योग्य नाही. कायद्याच्या चौकटीत राहून राजकारण करावे; असे वकील गुणरत्न सदावर्ते म्हणाले.

## सोलापुरात भुकंपाचे सौम्य धक्के !

सोलापूर : सोलापुरातून महत्त्वाची बातमी समोर आली आहे. सोलापूर जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. सोलापूर जिल्ह्यातील सांगोला येथे भूकंपाचे केंद्रबिंदू असल्याची माहिति मिळाली आहे. राष्ट्रीय भूकंपशास्त्र केंद्राने सोशल मीडियावर पोस्ट करत याबाबतची माहिती दिली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, आज (दि ३ ) सकाळी ११ वाजून २२ मिनिटांनी सोलापूर जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. सोलापूर जिल्ह्यात भूकंपाचे सौम्य धक्के बसले आहेत. पंढरपूर, सांगोला आणि मंगळवेढा येथे २.६ रिश्टरस्केल तीव्रतेचे धक्के जाणवले आहेत. दरम्यान या धक्क्यामुळे कोणत्याही पद्धतीची हानी झालेली नाही.

## बिंदुसरा नदीवरील पूल कम बंधार्याचा आ.क्षीरसागरांनी केला शुभारंभ

### बंधारा कम पुलामुळे बीड शहरासह परिसरातील गावांची भूजल पातळी वाढणार

बीड दि.३ (प्रतिनिधी):- बीड शहरातील बिंदुसरा नदीच्या पात्रात पूल कम बंधारा बांधणीच्या कामाला अखेर सुरूवात झाली असून आ.संदीप क्षीरसागरांनी गुरूवारी (दि.३) रोजी या कामाचा शुभारंभ केला. आ.क्षीरसागर हे काम होण्यासाठी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत आहेत. या कामाची सुरूवात झाली असून लवकरच हे काम पूर्ण होणार आहे. या पूल कम कोल्हापुरी पद्धतीच्या बंधार्यामुळे बीड शहर आणि परिसरातील आसपासच्या गावांमध्ये भूजल पातळीत मोठी वाढ होणार आहे. ही आनंदाची



बाब आहे.

बीड शहरातील बार्शी नाक्याजवळील असलेल्या बिंदुसरा नदी पात्रात पूल कम कोल्हापूरी बंधारा तयार करावा. जेणेकरून बिंदुसरा नदीतून वाहून जाणारे पाणी अडविले जाईल. हे काम करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागरांनी गेल्या अनेक वर्षांपासून हा विषय लावून धरला. अशा स्वरुपातील हे काम असणार आहे. या कामाच्या मंजूरीसाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी अनेक वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा केला. आणि अखेर आ.संदीप क्षीरसागरांच्या अथक प्रयत्नांना यश मिळाले आहे. बिंदुसरा नदीवरील बंधार्यामुळे बीड परिसरात सिंचन आणि पाणी उपलब्धतेसाठी मोठा फायदा होणार आहे. आ.संदीप क्षीरसागर यांच्या प्रयत्नांतून बीडसाठी अतिशय फायदेशीर असलेले हे काम लवकरच पूर्ण होणार आहे.

पूल कम बंधार्याचा सिंचन आणि पाणी साठवण्यासाठी मोठा फायदा

शुभारंभ झालेल्या बिंदुसरा नदीवरील पूल कम कोल्हापूरी बंधार्यामुळे बीड शहर आणि आजूबाजूच्या साधारण ५ किलोमीटर पर्यंतच्या परिसरात भूजल पातळीत वाढ होणार आहे. बीड जिल्ह्यात पावसाची अनियमितता असल्याने प्रत्येक उन्हाळ्यात पाणीटंचाईची परिस्थिती निर्माण होते. परंतु या कोल्हापूरी बंधार्यामुळे पाणी साठवणूक होईल. परिणामी पाणी उपलब्धता आणि शेती सिंचनासाठी याचा खूप मोठा फायदा या पूल कम बंधार्याचा होणार आहे. बिंदुसरा नदीवर बंधारा कम पूल ही संकल्पना मोठी दूरदर्शी होती. ती आ.संदीप क्षीरसागर यांनी डोळ्यासमोर ठेवून हे काम होण्यासाठी निरंतर प्रयत्न केले. शासन आणि प्रशासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा केला. अनेकवेळा अधिवेशनातही हा मुद्दा मांडला. दरम्यान आता आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रयत्नांना यश आले असून लवकरच हे काम पूर्ण झालेले असेल.

## पेट्रोल डिझेलचे दर घसरले!

मुंबई : एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच वाहनधारकांसाठी आनंदाची बातमी समोर आली आहे. आज (दि ३) पेट्रोल व डिझेलचे दर घसरले आहेत.




वेगवेगळ्या शहरांमध्ये पेट्रोल आणि डिझेलच्या किंमतीत चढउतार झाले आहेत. व्हॅट, मालवाहतूक शुल्क, स्थानिक कर इत्यादी घटकांवर अवलंबून पेट्रोल आणि डिझेलच्या किमती राज्यानुसार बदलत असतात. तर सकाळी हे दर जाहीर केले जातात आणि नंतर सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवले जातात.





| | 125 NEON | 125 CARBON FIBRE | NS 125 BASE | N160 TWIN DISC | N160 USD |
|---|---|---|---|---|---|
| खास किंमत | ₹85 594/-* | ₹92 282/-* | ₹99 994/-* | ₹1 22 722 /-* | ₹1 36 992/-* |
| बचत | ₹1 184/-* | ₹2 000/-* | | | ₹5 914/-* |

*एक्स-शोरुम किंमत

pulsar
DEFINITELY DARING

72198 21111 | BAJAJ SECURE • AMC • ROAD SIDE ASSISTANCE

*नियम आणि अटी लागू. *दाखवलेली एक्स-शोरुम किंमत पल्सर वेरिएंट्ससाठी आहे. किंमतीतील रिविजन विरुध्द पल्सर वेरिएंट्सची एक्स-शोरुम किंमत 31 मार्च 2025 नुसार. बजाज ऑटोने पूर्वसूचना न देता कोणतीही किंवा सर्व ऑफर्स काढून घेण्याचा अधिकार राखून ठेवला आहे. साहसी दृश्ये तज्ज्ञांकडून, व्यावसायिक निरिक्षणा अंतर्गत, नियंत्रित आणि राखीव वातावरणात, सामान्य लोक किंवा सार्वजनिक रस्त्यापासून दूर जागेवर केली आहेत. ह्या साहसी दृश्यांचं अनुकरण करू नका आणि नेहमी वाहतुकीचे व सुरक्षिततेचे नियम पाळा. एएमसी विशिष्ट मॉडेल्स आणि विशिष्ट राज्यात उपलब्ध. अधिक माहितीसाठी बजाज डीलरकडे चौकशी करा. रस्त्यावरील मदत तृतीय पक्षांकडून केली जाते आणि ती त्यांच्या नियम व अटींच्या अधीन आहे.

**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999, 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031. **Authorised Service Centre: Paithan** 9850823363, **Bidkin** 9881341213, **Vaijapur** 9422854982, **Lasur 7276183895**, **Gangapur 9423940806**, **Shivoor** 9850709785, **Mahalgaon 9284755116**, **Soygaon** 8956111154, **Phulambri** 7588075675, **Karmad** 9881159432, , **Pishore** 9130646246 **Bhokardan** 9923485831, **Georai** 8698568509, **Majalgaon** 9422380842, **Kaij** 9423715751, **Ambajogai** 9607091874, **Patoda** 9423471895, **Ashti** 7840900444, **Ambad** 9834910719, **Rajur** 8275333360, ,**Walsawangi** 8275855491, **Partur** 9112649438 , **Ausa** 8149542017 **Murud** 9860351229, **Chakur** 9049746161, **Renapur** 9881951011, **Omerga** 9890521818, **Paranda** 9421212280, **Kinwat** 9527257525, **Mukhed** 9579194868 , Umri 8149815921, Narsi 9860069635 **Bhokar** 9423139732, **Mahur** 96089073034 ,**Malegaon** 9403746580,**Vasmat** 9890173708, **Sengaon** 9762427999, **Jawala Bazar** 9890989138, **Pathri** 9860907003, **Palam** 9763385151, **Selu** 7499441540, **Gangakhed** 9421859114, **Ranisawargaon** 8668727630. **Khamgaon** 9921479013, **Rashin** 9975704778, **Mirajgaon** 7774826060 **Akole** 9881939099, **Alephata** 7507571715, **Ashwi** 8888201059, **Ghargaon** 9970302801,**Manchar** 9890014697, **Narayangaon** 9850112036, **Sakur** 9422146709, **Talegaon Dighe** 9970886986, **Nighoj** 9850224992, **Kotul** 9921583946, **Shevgaon** 9067893709, **Loni** 7709387085, **Ghodegaon** 7588030777, **Sonai** 7588603005, **Newasa** 9527554555, **Kukana** 7588079959.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## नुकसानभरपाई अंदाजेच, शेतकऱ्यांमध्येही गोंधळच

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** गतवर्षी खरीप हंगामाकरिता पीकविमा योजनेत सहभाग घेतलेल्या शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाई जमा होण्यास सुरुवात झाली आहे. मात्र, ही भरपाई जिल्ह्यातील किती शेतकऱ्यांना मिळणार किती रक्कम असणार याबाबत एसबीआय लाईफ इन्शुरन्स कंपनीही अनभिज्ञ आहे. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर नुकसानभरपाई मिळालेली नाही ते शेतकरी कृषी कार्यालयात खेटे मारत आहेत.

सन २०२४ विमा योजनेत सहभागी झालेल्या शेतकऱ्यांना विमा रक्कम मिळेलच असा आशावाद होता. मात्र, ज्या शेतकऱ्यांनी नुकसान झाल्याची पूर्वसूचना विमा कंपनीला विविध माध्यमातून दिली त्याच शेतकऱ्यांच्या शेतातील पीक नुकसानीचे पंचनामे झाले आणि तेच शेतकरी हे भरपाईसाठीही पात्र झाले आहेत. गतवर्षीच्या नुकसानीची भरपाई मिळण्यास २७ मार्चपासून सुरुवात झाली आहे.

या मदतीचे स्वरुप हे गटनिहाय वेगवेगळे आहे. असे असले तरी ज्या शेतकऱ्यांनी पूर्वसूचना दिली त्यांना मदत मिळालीच असे नाही. अनेक शेतकरी हे भरपाईच्या प्रतिक्षेत आहेत. त्यामुळे विमा भरलेली पावती, पंचनाम्याचा तपशील हे सर्व घेऊन शेतकरी कृषी कार्यालय जवळ करीत आहेत. याठिकाणी पॉलिसी नंबरवर मदत मिळणार की नाही, हे विमा प्रतिनिधीकडून तोंडी सांगितले जात आहे.

त्यामुळे उर्वरित शेतकऱ्यांना मदत मिळेलच असे नाही. त्यामुळे विमा कंपनीने जिल्ह्यातील शेतकऱ्यांची यादी, संख्या आणि किती रक्कम भरपाईपोटी मिळणार हे कृषी विभागाला कळविणे अनिवार्य आहे. त्यामुळे शेतकरी आता मदतीकडे डोळे लावून बसले असल्याचे दिसुन येते.



### संक्षिप्त वृत्त...

## मुंबई, पुणे, हैद्राबाद विमान सेवा लातूर मार्गे सुरु करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** पुणे-हैद्राबाद , मुंबई -औरंगाबाद - मुंबई, औरंगाबाद -हैद्राबाद -औरंगाबाद विमान सेवा लातूर मार्गे सुरू करावी अशा मागणीचे साकडे केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री ज्योतिरादित्य सिंधिया यांना जिल्हाधिकारी मार्फत दिलेल्या निवेदनाद्वारे लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे सचिव बिभीषण सांगवीकर घातले आहे.

लातूर शहर हे मराठवाड्यातील औद्योगिक, शैक्षणिक आणि वैद्यकीय शहर म्हणून झपाट्याने वाढत असून येथील व्यापाऱ्यांना आणि शेतकऱ्यांना दळणवळण करण्यासाठी अनंत अडचणीला सामोरे जावे लागत आहे.तसेच येथील रुग्णांना अनेक वेळा पुढील उपचारासाठी विमान सेवा उपलब्ध नसल्यामुळे त्यांचे आरोग्य धोक्यात येत आहे. लातूर येथे विमानतळ असून विमान सेवा नसल्यामुळे धाराशिव,अंबेजोगाई व लातूर परिसरातील नागरिकांना, व्यापाऱ्यांना,शेतकरी यांना फळे फुले व भाजीपाला निर्यातीसाठी वाहतुकीच्या वेळ अभावी अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत असून त्याचा आर्थिक फटका बसत आहे. पुणे- हैद्राबाद, मुंबई -औरंगाबाद-मुंबई, औरंगाबाद -हैद्राबाद-औरंगाबाद विमान सेवा लातूर मार्गे सुरू केल्यास त्याचा विमानतळ प्राधिकरणास फायदा होणार असून येथील व्यापारी, शेतकरी व नागरिकांची गैरसोय टळणार आहे असे निवेदनात सांगवीकर यांनी म्हटले आहे.

## 'रेणा'च्या नूतन संचालकांनी घेतली धीरज देशमुखांची भेट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** रेणापूर तालुक्यातील निवाडा येथील दिलीपनगरच्या रेणा सहकारी साखर कारखान्याच्या नूतन संचालकांनी जिल्हा बँकेचे अध्यक्ष माजी आमदार धीरज देशमुख यांची भेट घेतली. यावेळी विविध विषयांवर चर्चा झाली.

साखर उद्योगात अल्पावधीतच नावारूपाला आलेल्या रेणा सहकारी साखर कारखान्याची निवडणूक जाहीर झाली होती. यामध्ये सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, माजी मंत्री आमदार अमित देशमुख व जिल्हा बँकेचे अध्यक्ष धीरज देशमुख यांच्या नेतृत्त्वाखाली सदरील निवडणूक बिनविरोध पार पडली. नूतन संचालकांनी बुधवारी (दि.२) बाभळगाव येथे जिल्हा बँकेचे अध्यक्ष तथा 'रेणा'चे नूतन संचालक धीरज देशमुख यांची भेट घेतली. मतदारांनी जो विश्वास संचालक मंडळावर दाखवला तो सार्थ ठरवत असताना सर्वांना सोबत घेऊन शेतकरी हिताची वाटचाल करण्यासाठी नूतन संचालक मंडळ कटिबध्द असल्याचा विश्वास संचालक मंडळास धीरज देशमुख यांनी दिला. यावेळी माजी आमदार त्रिंबक भिसे, यशवंत पाटील, सर्जेराव मोरे, अनंत देशमुख, संग्राम माटेकर, धनराज देशमुख, गोविंद पाटील, सतीश पाटील, शंकर पाटील, तुकाराम कोल्हे, रणजित पाटील, बालाजी हाके यांच्यासह रेणापूर तालुका काँग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

## बुध्द विहारात पक्ष्यांना पिण्याच्या पाण्याची केली सोय

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** उन्हाळ्यात पशु-पक्ष्यांना चारा पाण्याची सोय व्हावी, यासाठी येथील



राजा शुध्दोधन बुध्द विहारात येळण्या बांधून त्यात पाणी भरण्यात आले. त्याचप्रमाणे काही येळण्यांमध्ये चाराही ठेवण्यात आला.

एकूण २० येळण्या बांधण्यात आल्या आहेत. याचा पशु-पक्षी लाभ घेत आहेत. येथील विशाल कांबळे यांच्यावतीने बुध्द विहार परिसरात या येळण्या बांधण्यात आल्या आहेत यावेळी आरोग्य सेविका गिरी, आशा छाया उपाडे, सारूबाई जाधव, चंद्रभागा रसाळ, कलावती कांबळे, ट्रस्टचे अध्यक्ष आनंद सोनवणे उपस्थित होते. प्रत्येक नागरिकांनी मुक्या प्राण्यांना उन्हाळ्यात पिण्याच्या पाण्याची व चाऱ्याची सोय करावी, असे मत आरोग्य सेविका गिरी यांनी व्यक्त केले. यावेळी ट्रस्टचे हेमंत जाधव, दगडू साळवे, राजकुमार कांबळे, गुलशन कांबळे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# उष्णतेशी लढ्यासाठी 'हरित लातूर'चा संकल्प

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** जिल्ह्यात उष्णतेचे प्रमाण वाढत आहे. यावर नियंत्रणासाठी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणमार्फत 'उष्णतेशी लढा' बुधवारी कार्यशाळा घेण्यात आली. जिल्हा नियोजन समिती सभागृहात झालेल्या या कार्यशाळेत विविध तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. जिल्ह्यातील उष्णता कमी करण्यासाठी विविध उपाययोजना आखण्यात येतील. त्याची सुरुवात 'रुफ वॉटर हार्वे स्टिंग' द्वारे केली जाईल. यासाठी 'अमृतधारा अभियान' हाती घेण्यात येईल असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर यांनी सांगितले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, पर्यावरण अभ्यासक अतुल देऊळगावकर यांनी यावेळी मार्गदर्शन केले. नवी दिल्ली येथील सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्नमेंटचे शाश्वत अधिवास विभाग प्रमुख रजनीश सरीन, वास्तूविशारद अविनाश हावळ, सार्वजनिक आरोग्य चळवळीतील अभ्यासक डॉ. अनंत फडके यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे मार्गदर्शन केले.

हवामान बदलामुळे उष्णतेच्या लाटेचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे केवळ भौगोलिकच नाही तर आर्थिक परिणामही समोर येत आहेत. जवळपास ४० टक्के अर्थकारण हवामान बदलामुळे प्रभावित होते. उष्णतेच्या लाटेमुळे लाखो लोकांच्या आरोग्यावर दुष्परिणाम होत आहेत. आपल्या जिल्ह्यातही काही प्रमाणात या संकटाचा सामना करावा लागत आहे.

आगामी काळात हे संकट कमी करण्यासाठी उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने पावले उचलून जिल्ह्याला ५० वर्षे पूर्ण होईपर्यंत म्हणजेच २०३२ पर्यंत 'हरित लातूर' ही संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी प्रयत्न केले जातील, असे जिल्हाधिकारी ठाकूर यांनी सांगितले.

लातूर जिल्ह्यात पुढील दोन महिन्यात 'अमृतधारा' अभियान प्रभावीपणे राबवून 'रुफ वॉटर हार्वे स्टिंग' ची कामे केली जातील. प्रत्येक शासकीय इमारतीसह खासगी इमारतींवरही 'रुफ वॉटर हार्वेस्टिंग' करण्यासाठी लोकसहभागातून हे अभियान राबविले जाईल. यातून आगामी पावसाळ्यात पडणारे पावसाचे पाणी जमिनीत मुरविण्याला प्राधान्य दिले जाईल, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

या अभियानात सर्व शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपले कार्यालय, आपले राहते घर येथे 'रुफ वॉटर हार्वेस्टिंग' करून सहभाग नोंदविण्याचे आवाहन केले. विहीर पुनर्भरण, वृक्ष लागवड आदी उपक्रमालाही गती द्यावी, असे त्यांनी सांगितले.



लातूर जिल्ह्यातही गेल्या काही वर्षांत वातावरणीय बदलांमुळे झालेल्या परिणामांचा सामना नागरिकांना करावा लागला आहे. वाढत्या उष्णतेमुळे यापेक्षाही अधिक गंभीर संकटाला सामोरे जावे लागू शकते. मात्र वेळीच सावध होऊन पर्यावरण संवर्धनासाठी उपाययोजना हाती घेतल्यास पाणीटंचाई, उष्माघात यासारख्या संकटांपासून दूर राहता येणे शक्य आहे. सध्या मोठ्या प्रमाणात शहरांचे काँक्रीटीकरण होत असल्याने उष्णतेचे प्रमाण अधिक आहे. ते रोखण्यासाठी बांधकाम करतांना उष्णता शोषून घेणारे साहित्य वापरण्याला प्राधान्य द्यायला हवे. शहरात वृक्ष लागवड, हिरवी मैदाने निर्माण करायला हवीत, असे ज्येष्ठ पर्यावरण तज्ज्ञ अतुल देऊळगावकर यांनी सांगितले.

झाडी, उद्याने याचे योग्य नियोजन करून वृक्ष लागवडीवर भर देण्याचे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकिब उस्मानी यांनी केले.

## लातूरला आज 'यलो' अलर्ट

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** मुंबईच्या प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्राने लातूर जिल्ह्यासाठी ४ एप्रिल या १ दिवसांसाठी 'यलो' अलर्ट जारी केला आहे. या दोन दिवसांत जिल्ह्यात तुरळक ठिकाणी ताशी ३० ते ४० कि.मी. वेगाने वादळी वारे वाहण्याची, विजेच्या कडकडाटासह आणि ढगांच्या गडगडाटासह हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता वर्तविली आहे.

या नैसर्गिक आपत्ती संदर्भात नागरिकांनी काळजी घ्यावी. विजेच्या गडगडाटासह पावसाची पूर्वकल्पना असल्याने बाहेर जाणे टाळा. जर मोकळ्या जागेत असाल आणि जवळपास कुठल्याही सुरक्षित इमारतीचा आसरा नसेल तर सखल जागेत जाऊन गुडघ्यात डोके घालून बसा. आकाशात विजा चमकत असल्यास घरात किंवा सुरक्षित इमारतीत आश्रय घ्या. घराच्या बाल्कनी, छत अथवा घराबाहेरील ओट्यावर थांबू नका.

आपण घरात असाल आणि घरातील विद्युत उपकरणे चालू असतील तर ती उपकरणे त्वरित बंद करा. तारांचे कुंपण, विजेचे खांब व इतर लोखंडी वस्तूंपासून दूर रहा. पाण्यात उभे असाल तर तत्काळ पाण्यातून बाहेर पडा. आकाशात विजा चमकत असल्यास घरातील लँडलाइन फोनचा वापर करू नका. शॉवरखाली अंघोळ करू नका. घरातील बेसिनचे नळ, पाण्याची पाइपलाइन यांना स्पर्श करू नका तसेच कुठल्याही विद्युत उपकरणांचा वापर करू नका. विजेच्या गडगडाटासह वादळी वारे चालू असताना लोखंडी धातूच्या सहाय्याने उभारलेल्या तंबूमध्ये किंवा शेडमध्ये आसरा घेऊ नका. उंच झाडाच्या खाली आसरा घेऊ नका. धातूंच्या उंच मनोऱ्याजवळ उभे टाकू नका. जर आपण घरात असाल तर उघड्या दारातून अथवा खिडकीतून वीज पडताना पाहू नका. हे बाहेर थांबण्याइतकेच धोकादायक आहे. नागरिकांनी या नैसर्गिक आपत्ती संदर्भात काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

## माजी सभापती प्रदीप चिद्रे यांचे निधन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** येथील लातूर नगरपरिषदेचे माजी



नगरसेवक तथा माजी सभापती प्रदीप सोपानराव चिद्रे (वय ५५) यांचे बुधवारी सायंकाळी पावणे आठ वाजेच्या सुमारास पुणे येथील खाजगी रुग्णालयात उपचार सुरु असताना निधन झाले.

त्यांच्या पार्थिवावर गुरुवारी सकाळी अकरा वा. येथील मारवाडी राजस्थान स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. प्रदीप चिद्रे यांच्या पश्चात आई, वडील, तीन भाऊ, एक बहीण, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे.

## सात विद्यार्थिनींना एसकेएफ शिष्यवृत्तीचा लाभ

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून आर्थिकदृष्ट्या दुर्बल व होतकरू मुलींसाठी एसकेएफ शिष्यवृत्ती कार्यक्रम चालवला जातो. या शिष्यवृत्तीच्या माध्यमातून सहा विद्यार्थिनींनी एमबीबीएस परिक्षेत यश मिळवले आहे.

सामाजिक बांधिलकी जपत, ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानने या विद्यार्थिनींसाठी एसकेएफ शिष्यवृत्ती उपलब्ध करून दिली, ज्यामुळे त्यांच्या संपूर्ण कुटुंबाचे स्वप्न साकार झाले. विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल सर्व स्तरावरून कौतुक होत आहे. तेजस्विनी

तरटे, नेहा चवरे, वैष्णवी पुयड, अमिषा निर्फळ, ऋतुजा मिरकले, प्रणिता सूर्यवंशी या विद्यार्थिनींनी एमबीबीएसचे शिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केले. नुकत्याच लागलेल्या एमबीबीएसच्या परीक्षेत त्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती आणि क्षमता बांधणीच्या माध्यमातून दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून बाहेर काढण्याचे काम करत आहे. सध्या आठ स्कॉलरशिप प्रोग्राम च्या माध्यमातून ६५० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांना घडवण्याचे काम प्रतिष्ठान करत असल्याचे ग्रामीण श्रमिक प्रतिष्ठानचे हरिश्चंद्र सुडे यांनी सांगितले.

## शैक्षणिक केंद्र असलेल्या लातूरचा क्रीडा क्षेत्रात नावलौकिक वाढावा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** महाराष्ट्र आणि संपूर्ण देशातील शैक्षणिक केंद्र म्हणून नावारूपाला आलेल्या लातूरमध्ये विद्यार्थी संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या तरुण वर्गाला क्रीडा क्षेत्रात करिअर घडवता यावे, त्यासाठी त्यांना सराव करता यावा म्हणून येथील जिल्हा क्रीडा संकुलाचा सर्वंकष पुनर्विकास आराखाडा तयार करून त्याची अंमलबजावणी करावी. पुरेशी जागा उपलब्ध करून विभागीय संकुलाच्या उभारणीलाही गती द्यावी आदी मागण्या आमदार अमित देशमुख यांनी बुधवारी दुपारी क्रीडामंत्री दत्ता भरणे यांच्या समवेत मंत्रालयातील त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीदरम्यान केल्या आहेत.

सर्व मागण्यांच्या संदर्भाने सकारात्मक प्रतिसाद देऊन त्यावर कार्यवाही करण्याच्या सूचना क्रीडा मंत्रीमहोदयांनी यावेळी संबंधित अधिकाऱ्यांनी दिल्या आहेत.

लातूर जिल्हा क्रीडा संकुलातील विविध क्रीडा मैदानांची दुरुस्ती व इतर सुविधाची उपलब्धता तसेच लातूर येथे मंजूर असलेल्या विभागीय क्रीडा संकुल उभारणी संदर्भात आमदार अमित देशमुख यांनी वेळोवेळी केलेल्या मागण्यांचा संदर्भात बुधवारी क्रीडामंत्री दत्ता भरणे यांनी मंत्रालयात संबंधित अधिकाऱ्यांची एकत्रित बैठक घेतली.

लातूर येथील क्रीडा क्षेत्राचा विकास करण्यासाठी नोंदविण्यात आलेल्या विविध मागण्यावर एकत्रित स्वतंत्र बैठक बोलावून सकारात्मक निर्णय घेण्याचे भरणे यांनी मान्य केले.

## लातूरलाच आयुक्तालय हवे; शासनाकडे भूमिका मांडा

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** लातूर येथेच विभागीय आयुक्त कार्यालय झाले पाहिजे आणि यासाठी लातूर जिल्ह्यातील मंत्री, खासदार व आमदारांनी महाराष्ट्र शासनाकडे आग्रही भूमिका मांडावी, अशी मागणी लातूर विभागीय महसूल आयुक्तालय निर्माण कृती समितीच्यावतीने करण्यात आली.

राज्याचे सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांची शिष्टमंडळाने भेट घेऊन लातूरकरांची आयुक्तालयाची मागणी ही केवळ भावनिक नसून गुणवत्तेवर आधारलेली आहे. ही मागणी मराठवाड्याच्या समतोल विकासासाठी महत्त्वपूर्ण आहे. आजघडीला लातूर येथे ३६ विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. मराठवाड्यातील छ. संभाजीनगर आणि जालना हे जिल्हे सोडल्यास परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव, बीड हे सहा जिल्हे विविध विभागीय कार्यालयाने लातूरशी जोडले आहे.

विभागीय आयुक्तालयासाठी आवश्यक असणारी इमारत गेली १५ वर्षांपासून तयार आहे. त्यामुळे महाराष्ट्र शासनाला लातूर येथे दुसरे विभागीय आयुक्त कार्यालय स्थापन करणे सहज शक्य आहे. म्हणून मंत्री पाटील यांनी महाराष्ट्र शासनाकडे लातूर येथेच महसुल आयुक्तालय स्थापन करण्यासाठी आग्रहाची भूमिका मांडावी, अशी मागणी कृती समितीने केली.

लातूर जिल्ह्यातील सर्व आमदारांना महसूल आयुक्तालय निर्माण कृती समितीच्यावतीने भेटून या प्रश्नावर शासन दरबारी तसेच विधानसभेत भुमिका मांडण्यासाठी आग्रह करण्यात येणार आहे. या शिष्टमंडळात माजी आ. वैजनाथ शिंदे, ॲड. व्यंकट बेद्रे, ॲड. बळवंत जाधव, ॲड, अण्णाराव पाटील, भाई उदय गवारे, मोईज शेख, कॉ. संजय मोरे, ॲड. प्रदीप गंगणे, ॲड. व्यंकट नाईकवाडे, धनराज साठे आदींचा समावेश होता.

## अंध कलाकार बालाजी ससाने यांना वैयक्तिक संगीत संच प्रदान



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब), शाखा लातूरच्यावतीने गांधीनगर येथील बालाजी अर्जुन ससाने या अंध कलाकार बांधवाला वैयक्तिक संगीत संच नुकताच श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आदिनाथ सांगवे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रदान करण्यात आला.

यावेळी नॅबचे अध्यक्ष डॉ. विजयभाऊ राठी, सामाजिक कार्यकर्त्या चंद्रकला भार्गव, डॉ. वसुंधरा गुडे, प्राचार्य डॉ. संजय गवई, डॉ. माधव गोरे, रोटेरियन नानकजी जोधवानी, अभयजी शहा, डॉ. अमित मेहत्रे, राजारामजी बिलोलीकर, पत्रकार दत्तात्रय परळकर, आशिष बाहेती, संदीप चोपडे आणि अश्विनी ससाणे यांची उपस्थिती होती. नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड (नॅब), शाखा लातूरच्यावतीने विविध सामाजिक उपक्रम राबविले जातात.

मिरागी नेत्रालय ही संस्था डोळ्यांच्या सर्व उपचारासाठी अविरत सेवा करीत आहे. अनेक मोफत शिबिर व शस्त्रक्रिया मिरागीने केल्या आहेत. खासकरून मुलांचे तिरळेपणाचे ऑपरेशन, मोतीबिंदू व अनेक डोळ्याच्या शस्त्रक्रिया एक तर मोफत किंवा अतिशय अल्प दरात केल्या जातात. बालाजी अर्जुन ससाने हा अंध कलाकार असून तो विविध सांस्कृतिक व समाज प्रबोधनात्मक कार्यक्रम सामाजिक जाणीव जागृतीच्या माध्यमातून करीत असतो. जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, विविध शाळा, महाविद्यालय, कौटुंबिक आणि वैयक्तिक ठिकाणी ते आपली कला सादर करीत असतात .

# पालिकेने पुन्हा अतिक्रमण हटविले

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३ एप्रिल -** शहरातील गंजगोलाईतील मस्जीद रोडवर वाहन चालविणे तर दूरच पण साधे चालताही येत नव्हते. त्यामुळे नागरिकांकडून ओरड सुरू होती. त्यामुळे महानगरपालिका प्रशासनाने पोलीस यंत्रणेच्या मदतीने बुधवारी या रस्त्यावरील हातगाडेवाले आणि दुकानदारांनी रस्त्यावर केलेले अतिक्रमण हटविले. यामुळे या रस्त्याने मोकळा श्वास घेतला आहे.

लातूर शहराच्या गंजगोलाईतील सर्व अतिक्रमणे हटवून गोलाई अक्रिमणमुक्त करण्याचे आदेश उच्च न्यायालयाने दिल्यानंतर महापालिका प्रशासनाने संपूर्ण गोलाई अतिक्रमणमुक्त केली होती. त्यामुळे गोलाईने मोकळा श्वास घेतला होता. कारवाईची मोहीम सलग तीन महिने सुरू असल्याने गांधी चौकाकडून पूर्वेकडे जाणाऱ्या



वाहनधारक, पादचाऱ्यांची अडचण दूर झाली होती. हातगाडे रस्त्यावर येऊन व्यापार करीत असल्याने अनेकांना त्रास होत होता. लातूरमध्ये काहीच शिस्त राहिली नव्हती. यामुळे सामान्य नागरिकांतून संताप व्यक्त होत होता. परंतु, न्यायालयाने आदेश दिल्यानंतर महापालिकेने गोलाईतील सर्वच हातगाड्यांची अतिक्रमणे हटविली. यामुळे सुमारे तीन महिने गंजगोलाई रिकामी वाटत होती. दरम्यान, व्यापाऱ्यांच्या आग्रहामुळे पवित्र रमजानच्या रोजांमुळे गंजगोलाई परिसरासह मस्जीद रोडवर फळ आणि भाजीपाला विक्रीसाठी महापालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी परवानगी दिली होती.

ईदनंतर सर्वच हातगाडे व्यापाऱ्यांना फ्रूट मार्केट परिसरात जाण्यास सांगण्यात आले होते. अतिक्रमण हटविण्यावरून गेल्या काही दिवसांपासून फेरीवाले, छोटे व्यापारी, भाजीपाला विक्रेते यांच्यात वाद सुरू आहे. परवाच रमजान ईद झाली. त्यानंतरही हातगाडेवाल्यांनी मस्जीद रोडवर अतिक्रमण केले होते. यामुळे पादचाऱ्यांनाही या रोडवरून चालणेही जिकिरीचे झाले होते. यामुळे नागरिकांतून पुन्हा ओरड सुरू झाली होती.

त्यामुळे बुधवारी (दि.२) महापालिका प्रशासनाने पोलीस यंत्रणेच्या मदतीने मस्जीद रोडवरील अतिक्रमणे हटविली.

### संपूर्ण शहरात रस्त्यांवर अतिक्रमण

शहरातील सर्वच व्यावसायिक आपल्या दुकानाच्या पुढे अर्धे दुकान मांडून रस्त्यावर अतिक्रमण करीत आहेत. दुकानदारांनी अर्धे रस्ते दुकानातील साहित्यांनीच व्यापून टाकल्याने रस्त्याचे चालण्यासही अडचण होत आहे. संपूर्ण शहरात अशीच स्थिती आहे. यामुळे रस्त्यावर दुकान मांडलेल्या व्यापाऱ्यांचे अतिक्रमण काढण्याची मागणी होत आहे.

या अतिक्रमण हटाव मोहिमेत शहर वाहतूक नियंत्रण शाखेचे पोलीस निरीक्षक गणेश कदम, महापालिकेचे अतिक्रमण हटाव मोहिमेचे प्रमुख रवी कांबळे, बंटी उबाळे, मुस्तफा शेख, दत्ता पवार, आतिश गायकवाड, रज्जाक शेख, सुनील ढवळे, संतोष कांबळे, सुनील कांबळे यांचा सहभाग होता.

## अग्रलेख...

# युनूस यांना आता चीन-प्रेमाचे भरते

बांगलादेशाच्या अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी त्यांच्या चीन दौऱ्यात भारताच्या पूर्वोत्तर राज्यांचा उल्लेख करून एक नवा वाद निर्माण केला आहे. गेल्या वर्षी ऑगस्ट महिन्यात पंतप्रधान शेख हसीना यांनी बांगलादेश सोडल्यानंतर शेख युनूस निरंतर भारताच्या मार्गात काटे पेरण्याचे काम करीत आहेत. युनूस कधी पाकिस्तानसोबत रासलीला खेळतात, तर कधी चीनच्या कडेवर बसून भारतविरोधी कारस्थाने करतात. त्यांनी हातात भिकेचा कटोरा घेऊन चीनपुढे हात पसरवण्यात भारताला आक्षेप असण्याचे कारणच नाही. मात्र त्यांनी पूर्वोत्तर राज्यांचा उल्लेख करून भारतविरोधी वातावरणाची निर्मिती केली आहे, ज्यावर आक्षेप घेतल्याशिवाय पर्याय नाही. युनूस म्हणाले, भारताच्या पूर्वोत्तर भागातील सात राज्यांजवळ समुद्री सीमा नाही. चीन बांगलादेशात गुंतवणूक करून मोठा नफा कमवू शकतो त्यामुळे त्याने बांगलादेशातील आपली आर्थिक उपस्थिती अधिक मजबूत करावी. पूर्वोत्तर भागात समुद्रापर्यंत पोहोचण्यासाठी भारताला बांगलादेशशिवाय पर्याय नाही, अशी भूमिका घेऊन त्यांनी या दौऱ्यात चीनकडून २.१ बिलियन डॉलर्सची गुंतवणूक प्राप्त करण्यात यश मिळविले असले तरी भारताच्या पूर्वोत्तर राज्यांचा उल्लेख करून, आपला खुजेपणा दाखवला आहे. त्यांच्या या भूमिकेचा खरपूस समाचार घेतला जायला हवा. तसा तो घेतलाही गेला. त्यांच्या या टिप्पणीचा भारतातील नेत्यांनी तीव्र आक्षेप नोंदविला. आसामचे मुख्यमंत्री हिमंता बिस्वा सरमा, जे अतिशय तिखट प्रतिक्रियांसाठी ओळखले जातात, त्यांनी बांगलादेश तोडून भारत समुद्रापर्यंत रस्ता बांधू शकतो, असा परखड इशारा दिला आहे. युनूस यांची टिप्पणी चिथावणीखोर आणि अस्वीकारार्ह म्हणावी लागेल. भारताने तर अशी टिप्पणी खपवून घेऊ नये. ईशान्य भारताला मुख्य भूभागाला जोडण्यासाठी रस्त्यांचे जाळे उभारले जाण्याची गरज कुणीच नाकारू शकत नाही. त्यादृष्टीने भारताने पावलेदेखील उचलली आहेत. भारतातील काही देशविरोधी घटक ईशान्य भारताला मुख्य भागापासून वेगळे करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. मात्र आता त्या शक्ती ठेचून काढल्या जायला हव्यात. चिकन नेक कॉरिडॉर आणि आजूबाजूला रस्त्यांचे जाळे उभारले गेल्यास मुख्य भागासोबतचा ईशान्य राज्यांचा संपर्क खंडित होणार नाही. युनूस यांच्या या विधानाची दखल टिपरा मोथा पक्षाचे प्रमुख प्रद्योत माणिक्य यांनी घेतली आहे. ते म्हणाले, अभियांत्रिकी आव्हानांवर कोट्यवधी रुपये खर्च करण्याऐवजी बांगलादेशाचे तुकडे करून, सागरी प्रवेश निश्चित केला जायला हवा. चितगाव येथील आदिवासी समुदायांना १९४७ पासूनच भारतासोबत राहायचे होते. बांगलादेशातील लाखो त्रिपुरी, गारो, खासी आणि चकमा समुदायाचे लोक अजूनही अन्याय सहन करीत आहेत. त्यामुळे ते राहात असलेला भाग भारतात विलिन करणेच सोयीस्कर होईल. काँग्रेस पक्षाचे नेते पवन खेडा यांनीही युनूस केवळ भारताला डिवचण्यासाठी चीनचा वापर करीत असल्याचे स्पष्ट करून, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून बांगलादेश सरकारची ईशान्येकडील राज्यांबद्दलची भूमिका अतिशय धोकादायक असल्याचे म्हटले आहे. पंतप्रधानांचे आर्थिक सल्लागार संजीव सन्याल यांनीही या वक्तव्याबाबत आक्षेप घेतला आहे. चीनने बांगलादेशात गुंतवणूक करावी, आम्हाला त्यात कुठलीही अडचण नाही. मात्र सात राज्यांच्या केलेल्या उल्लेखाचा आम्ही कोणता अर्थ काढावा?

अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, मिझोराम, नागालँड, मणिपूर आणि त्रिपुरा ही भारताची सेव्हन सिस्टर्स म्हणून ओळखली जाणारी पूर्वेकडील राज्ये आहेत. या सातही राज्यांचे भारताच्या दृष्टीने भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामरिक महत्त्व आहे. या राज्यांच्या सीमा म्यानमार, बांगलादेश, भूतान आणि चीनला लागून असल्याने त्यांचे महत्त्व अनन्यसाधारण आहे. ही राज्ये चिकन नेकद्वारे (सिलिगुडी कॉरिडॉर) भारताच्या मुख्य भूमीशी जोडलेली आहेत, त्यामुळे राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टिकोनातूनही ती महत्त्वाची ठरतात. ईशान्य भारत हा जगातील सर्वात समृद्ध जैवविविधता असलेल्या प्रदेशांपैकी एक आहे. युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांमध्ये असलेले काझीरंगा आणि मानस राष्ट्रीय उद्यान (आसाम) याच प्रदेशात आहे. येथे एकशिंगी गेंड्यासारख्या अनेक दुर्मिळ प्रजाती आढळतात. या राज्यांच्या स्वतःच्या वेगळ्या भाषा, परंपरा आणि जीवनशैली आहेत. हा प्रदेश अनेक बोलीभाषांसाठी ओळखला जातो. चहाचे उत्पादन, नैसर्गिक वायू, तेल आणि बांबू यासारख्या संसाधनांनी ही सात राज्ये समृद्ध आहेत. येथे पर्यटनाच्या भरपूर संधी आहेत. ब्रह्मपुत्रा नदी आणि तिच्या उपनद्या या प्रदेशाला जलविद्युत निर्मितीचे एक प्रमुख केंद्र बनवतात, जी भारताच्या ऊर्जा सुरक्षेत योगदान देऊ शकतात. भारत आणि बांगलादेश आणि आग्नेय आशियाशी जवळीक असल्यामुळे, हा प्रदेश ''ॲक्ट ईस्ट पॉलिसी'' अंतर्गत भारतासाठी व्यापार आणि कनेक्टिव्हिटी प्रवेशद्वार म्हणून उदयास येत आहे. या साऱ्या पृष्ठभूमीवर तेथील व्यवसायाच्या संधीशी चीनचा संपर्क जोडण्याचे प्रयत्न करणे म्हणजे भारताला डिवचण्यासारखेच आहे. या मुद्यावर आरडाओरड झाल्यावर आणि भारताने युनूस यांनी आपले वक्तव्य मागे घ्यावे, अशी मागणी केल्यावर, बांगलादेशाने हे वक्तव्य चीनच्या दबावाखाली दिल्याचा दावा केला आहे. पण त्यातून पूर्वोत्तर राज्यात तणाव निर्माण करण्याचे बांगलादेशाचे मनसुबे उघड झाले. युनूस यांचे हे वक्तव्य केवळ भारताचा अपमान करणारे नाही तर भारत आणि बांगलादेश यांच्यातील व्यापार आणि रस्त्यांच्या संदर्भात झालेल्या करारांचे उल्लंघन करणारे असल्याची बाब ध्यानात घेतली जायला हवी. भारताजवळ खूप मोठी समुद्री सीमा आणि देशाची आर्थिक गरज पूर्ण करू शकणारी कितीतरी बंदरं आहेत. त्यामुळे या देशाने भारताला कमी लेखण्याची कृती केव्हाही त्याच्या अंगलट येऊ शकते.

बांगलादेशात हिंदूंवरील अत्याचार अजूनही पूर्णतः थांबलेले नाहीत. युनूस यांच्या नेतृत्वातील सरकारमध्ये हिंदूंना न्याय मिळणे कठीण झालेला आहे. भारताचे बांगलादेशाला वठणीवर आणण्याचे पूर्ण प्रयत्न सुरू आहेत. पण अजून त्यात पूर्ते यश आलेले नाही. भारताच्याच पुढाकारामुळे बांगलादेशला स्वातंत्र्य मिळाले होते. त्यामुळे या देशाचे पाकिस्तान, चीन आणि अमेरिकेच्या आडून होणारे हल्ले भारतासाठी तापदायक ठरत आहेत. नदीच्या पाण्यावरूनही दोन्ही देशात वाद आहे. गंगा, फरक्का आणि तिस्ता आदी छोट्या-मोठ्या नद्यांच्या पाण्याच्या मुद्यावरून उभय देशांत वारंवार खटके उडत असतात. तथापि, गंगेच्या पाण्याबाबत उभय देशांनी समझोता करून सहमती मिळविली आहे. तिस्ता आणि फेनीसारख्या अनेक नद्यांबाबत अद्याप वाटाघाटी सुरू आहेत. बांगलादेशातून भारतात होणारे बेकायदेशीर स्थलांतर, ज्यामध्ये निर्वासितांचा समावेश आहे, हा एक गंभीर मुद्दा आहे. या घुसखोरीमुळे भारतीय सीमावर्ती राज्यांवर दबाव येतो, ज्यामुळे संसाधने आणि सुरक्षेवर परिणाम होतो. बांगलादेशमार्गे रोहिंग्या निर्वासित भारतात प्रवेश करीत असल्याने ही समस्या आणखी वाढली आहे. असे स्थलांतर रोखण्यासाठी बनवण्यात आलेल्या राष्ट्रीय नागरिक नोंदणीमुळे (एनआरसी) बांगलादेशची चिंता वाढली आहे. एका आकडेवारीनुसार बांगलादेशातून सुमारे ३ कोटी लोकांनी भारतात अवैध घुसखोरी केलेली आहे. या घुसखोरीमुळे सीमावर्ती राज्यांमधील लोकसंख्येचे बदल झालेले आहे. अनेक मतदारसंघ मुस्लिमबहूल झाले असून, त्यातून राष्ट्रीय समस्या निर्माण झाली आहे. भारतात ठिकठिकाणी झालेल्या दंगलींमध्ये रोहिंग्या मुस्लिमांचा सहभाग शोधून काढला जात आहे. कारण अशा मुस्लिमांनी देशाच्या सर्वच भागांत आश्रय घेण्यास सुरुवात केली आहे. या सर्व बाबी भारत सरकार बांगलादेशकडे उपस्थित करीत असला तरी युनूस सरकार त्याकडे फारसे लक्ष देण्यास तयार नाही. यातून गुन्हेगारी, अपहरण, खंडणी आणि लव्ह जिहादची प्रकरणे वाढीस लागली आहेत. सीमेपलीकडून अमली पदार्थांच्या तस्करीच्या अनेक घटना घडत आहेत. या सीमांमधून मानवांची (विशेषतः मुले आणि महिलांची) तस्करी केली जाते आणि विविध प्राणी आणि पक्ष्यांच्या प्रजातींची शिकार केली जाते. या बाबी भारताला सतावत असतानाच युनूस यांना चीन-प्रेमाचे भरते आले असून, सात राज्यांचा मुद्दा उपस्थित करून त्यांनी भारतासोबत शत्रुत्व विकत घेतले आहे.

## तंत्रवेध

**डॉ. दीपक शिकारपूर**

# एआयचा वापर पर्यावरण रक्षणासाठी

एव्हाना आपण एका मोठ्या डिजिटल युगात जगू लागलो असून चौथी औद्योगिक क्रांती अनुभवत आहोत. ऑटोमेशन आणि कृत्रिम बुद्धिमत्ता ही आज सगळ्यात वेगाने वाढणारी क्षेत्रे बनली आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील झेप पर्यावरणासह अनेक क्षेत्रांमध्ये प्रभावी मदत करू शकते. एआय मोठ्या प्रमाणावर डेटाचे विश्लेषण करून पर्यावरणीय बदलांची भविष्यवाणी करण्यास सक्षम आहे. यामुळे आपण आपत्तींच्या पूर्वतयारीसाठी अधिक चांगले नियोजन करू शकतो आणि दुष्परिणाम मर्यादित ठेवू शकतो. उदाहरणार्थ, एआयचा वापर करून आपण वादळे, दुष्काळ आणि पूर यांची भविष्यवाणी करू शकतो. उपग्रह आणि ड्रोनमध्ये एआयचा वापर करून आज आपण मोठ्या भौगोलिक क्षेत्रांचे निरीक्षण करू शकतो आणि पर्यावरणीय बदलांचा मागोवा घेऊ शकतो. उदाहरणार्थ, वन कटाई, प्रदूषण आणि जलवायू परिवर्तन यांचा मागोवा घेण्यासाठी एआयचा वापर केला जातो. एआयचा वापर करून आपण ऊर्जावापराचे प्रमाण कमी करू शकतो. उदाहरणार्थ, इमारतींमध्ये एआय-आधारित सिस्टिम्सचा वापर करून आपण तापमान आणि प्रकाश व्यवस्थापन करू शकतो. एआयचा वापर करून आपण जलवायू परिवर्तनाशी संबंधित समस्यांवर काम करू शकतो. कार्बन उत्सर्जनाचे मॉडेलिंग करण्यासाठी, नवीन ऊर्जा स्रोत शोधण्यासाठी आणि जलवायू परिवर्तनाचे परिणाम कमी करण्यासाठी एआयचा वापर केला जातो. एआयचा वापर करून आपण दुर्मिळ प्रजातींचे निरीक्षण करू शकतो आणि त्यांचे संरक्षण करण्यासाठी योजना आखू शकतो.

थोडे पुढे जाऊन पाहायचे झाल्यास एआयचा वापर करून आपण अधिक टिकाऊ कृषी पद्धती विकसित करू शकतो, हेही लक्षात घ्यायला हवे. उदाहरणार्थ, पाणी आणि खतांचा वापर कमी करण्यासाठी, कीटकांचे नियंत्रण करण्यासाठी आणि पिकांचे उत्पादन वाढवण्यासाठी एआयचा वापर केला जातो. एआयचा वापर करून आपण प्रदूषणाचा स्तर मोजून प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना आखू शकतो. आपण जे मोजत नाही ते व्यवस्थापित करू शकत नाही, ही जुनी व्यावसायिक म्हण आहे. जगाला हवामानबदल, निसर्ग आणि जैवविविधता हानी, प्रदूषण आणि कचरा या तिहेरी ग्रहांच्या संकटाचा सामना करावा लागत असल्याने हे आज पूर्वीपेक्षा अधिक खरे आहे. पर्यावरणाचा डेटा पूर्वीपेक्षा अधिक प्रमाणात उपलब्ध आहे, परंतु या संकटांचे व्यवस्थापन करण्यासाठी त्याचा अर्थ लावला जातो आणि त्यावर कार्य केले जाते हे महत्त्वाचे आहे. यासाठी केंद्रस्थानी असलेले एक तंत्रज्ञान म्हणजे कृत्रिम बुद्धिमत्ता. कार्यक्षम इमारतींची रचना करण्यापासून, जंगलतोडीचे निरीक्षण करण्यापासून अक्षय ऊर्जा योजना राबवण्यापर्यंत पर्यावरणीय आव्हानांना तोंड देण्याकामी भूमिका बजावू शकते. संवर्धित शेतीमध्ये पिकांचे रोग आणि समस्या लवकर ओळखणे, पशुधनाला वेळेवर पोषण देणे आणि पुरवठा आणि मागणीवर आधारित कृषी निविष्ठा आणि परतावा इष्टतम करण्यासाठी रोबोटिक्सद्वारे स्वयंचलित डेटा संकलन, निर्णय घेणे आणि सुधारात्मक कृती यांचा समावेश आहे. हे उपाय कृषी उद्योगाची संसाधन कार्यक्षमता वाढवून पाणी, खते आणि कीटकनाशकांचा वापर कमी करतात.

हवामान माहितीशास्त्राचे एक नवीन उपक्षेत्र हवामान अंदाजांमध्ये मूलभूत बदल करण्यासाठी आणि हवामान बदलाच्या परिणामांबद्दलची समज सुधारण्यासाठी एआयचा वापर करते. पारंपरिकपणे उच्च कार्यक्षमतेचे ऊर्जाकेंद्रित संगणक आवश्यक असते, परंतु सखोल-शिक्षण नेटवर्क संगणक अधिक जलद चालवण्यास आणि गणनामध्ये वास्तविक-जागतिक प्रणालीची अधिक जटिलता समाविष्ट करू देते. अवघ्या एका दशकात संगणकीय शक्ती आणि एआयमधील प्रगती घरातील संगणकांना आजच्या सुपरकॉम्प्युटरइतकी शक्ती सक्षम करेल, संशोधनाची किंमत कमी करेल, वैज्ञानिक उत्पादकता वाढवेल आणि शोधांना गती देईल. तंत्रे मॉडेल्समधील पूर्वाग्रह सुधारण्यास, डेटाचा ऱ्हास टाळण्यासाठी अचूक डेटा निर्माण करण्यास, घटनांचा अंदाज लावण्यास आणि प्रभाव मॉडेलिंगसाठी वापरण्यात मदत करू शकतात. एआय कचरा व्यवस्थापनातही मदत करू शकते. एआय-आधारित इमेज प्रोसेसिंग तंत्रज्ञानाच्या साहाय्याने कचऱ्याचे स्वयंचलित वर्गीकरण शक्य होते. यामुळे कचऱ्याचे पुनर्वापर आणि पुनर्चक्रण (रिसायकलिंग) अधिक कार्यक्षम बनते. एआयच्या मदतीने कचरा संग्रहण वाहनांचे मार्ग अधिक प्रभावीपणे नियोजित करता येतात. यामुळे कचरा संग्रहण खर्च कमी होतो आणि कचरा संग्रहण प्रक्रिया अधिक जलद होते. एआयचा वापर करून भविष्यात किती कचरा निर्माण होईल याचा अंदाज लावणे शक्य होते. यामुळे कचरा व्यवस्थापन व्यवस्थेचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करता येते. एआय-आधारित सेन्सर आणि कॅमेरे वापरून कचरा टाकण्याच्या ठिकाणांचे निरीक्षण केल्यामुळे कचरा भरून जाण्याची समस्या टाळता येते.

एआय-आधारित चॅटबॉट्स आणि मोबाईल ॲप्सच्या साह्याने नागरिकांना कचरा व्यवस्थापनविषयी जागरूक करणे शक्य होते. या प्रक्रियेमध्ये स्मार्ट कचरा पेट्या स्वतःच कचऱ्याचे वर्गीकरण करतात आणि कचरा वेगवेगळ्या कंटेनरमध्ये टाकतात. कचरा ट्रॅकिंग सिस्टिमच्या मदतीने कचरा संग्रहण वाहनांचे वास्तविक वेळेतील स्थान आणि मार्ग तपासता येतात. एआयचा वापर करून कचरा पुनर्वापर केंद्रांमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण आणि पुनर्वापर अधिक कार्यक्षम बनवले जाते. एआयचा वापर करून कचरा व्यवस्थापन अधिक कार्यक्षम, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक बनवता येते.

एआयच्या मदतीने ऊर्जेचा अधिक प्रभावीपणे वापर करणे शक्य होत आहे. एआय ऊर्जा व्यवस्थापनात उत्तम मदत करू शकते. एआयच्या मदतीने इमारती, कारखाने आणि इतर सुविधांमध्ये ऊर्जेचा वापर कसा होतो याचे सखोल विश्लेषण करता येते. यामुळे ऊर्जेचा अपव्यय कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात हे ओळखता येते. एआयचा वापर करून भविष्यात किती ऊर्जा लागेल याचा अंदाज लावणे शक्य होते. यामुळे ऊर्जेचे नियोजन अधिक चांगल्या प्रकारे करता येते. एआयच्या मदतीने ऊर्जा उत्पादनाचे नियोजन अधिक प्रभावीपणे करता येते. यामुळे ऊर्जा उत्पादन आणि मागणीमध्ये समतोल साधणे शक्य होते. एआयच्या मदतीने ऊर्जा ग्रिड अधिक कार्यक्षम बनवता येते. यामुळे ऊर्जा वितरण अधिक प्रभावीपणे होते. एआयच्या मदतीने सौर, पवन आणि जलविद्युत ऊर्जा स्रोतांना ऊर्जा ग्रिडमध्ये अधिक प्रभावीपणे जोडता येते. आणखी काही मुद्दे तपासून पाहिले असता एआयच्या मदतीने ऊर्जाबचतीचे काही नवीन उपाय शोधणे शक्य होत असल्याचे लक्षात येते. उदाहरणार्थ स्मार्ट मीटरचा वापर. स्मार्ट मीटर्स ऊर्जेचा वापर वास्तविक वेळेत मोजतात आणि ही माहिती एआय सिस्टिमला पाठवतात. या माहितीच्या आधारे ऊर्जा वापराचे विश्लेषण केले जाते. स्मार्ट ग्रिड ऊर्जा उत्पादन आणि वितरण अधिक कार्यक्षम बनवतात. मोबाईल ॲप्स वापरकर्त्यांना त्यांच्या ऊर्जेच्या वापराची माहिती देतात आणि ऊर्जाबचत करण्यासाठी सूचना देतात. एआय हे ऊर्जा व्यवस्थापनातील एक महत्त्वपूर्ण साधन आहे. याच्या मदतीने ऊर्जेचा अधिक प्रभावीपणे वापर करणे, पर्यावरण संरक्षण आणि ऊर्जा खर्च कमी करणे शक्य आहे. त्या दृष्टीने तंत्रज्ञानाचा वापर या क्षेत्रात करणे आणि त्या दृष्टीने नानाविध शक्यतांचा विचार करणे शक्य आहे.

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

## वेध

**नीलेश जोशी**

# जीवघेणे प्लॅस्टिक प्रदूषण थांबवा

आपली संस्कृती निसर्गपूजक आहे. म्हणून स्वाभाविकच येथे पर्यावरण संवर्धनाला देखील अनन्यसाधारण महत्त्व आहे. विविध सण, उत्सवाची परंपरा असणाऱ्या आमच्या संस्कृतीतील रूढी, परंपरा आपसूकच पर्यावरण संवर्धनाला पूरक ठरतात. पूर्वापार भक्तिभावाने, श्रद्धेने साजरे करीत असलेले पर्यावरणपूरक सण एकीकडे तर दुसरीकडे दैनंदिन जीवनात कळत-नकळत पर्यावरणावर आघात होणाऱ्या सवयी अशी विसंगती सद्य:स्थितीत आहे. नियमित व्यवहार काही अंशी सोपे आणि सुखकर व्हावे म्हणून प्लॅस्टिक पिशव्यांसह प्लॅस्टिक वस्तूंचा वापर दिवसेंदिवस वाढतोच आहे. कळते पण वळत नाही अशी आपल्या समाजाची स्थिती आहे. व्यक्तिशः आपण सर्वच जण सर्रास प्लॅस्टिक पिशव्यांचा वापर करतो. खरचं आपल्याला पर्यावरणाची चिंता आहे का? असेल तर आपण प्लॅस्टिकचा वापर थांबविणार आहोत का? याचे उत्तर स्वतःला देण्याची वेळ आता येऊन ठेपली आहे. कारण प्लॅस्टिकमुळे केवळ माणसाचाच नव्हे तर पशू, पक्ष्यांचा जीव धोक्यात आला आहे. एवढेच नव्हे तर नष्ट न होणाऱ्या प्लॅस्टिकमुळे शेतजमिनीची पोत दिवसेंदिवस खालावत असून त्यामुळे भविष्यात कृषी उत्पादनाची समस्या गंभीर होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

खरं म्हणजे याच विविध समस्यांमुळे शासनाने सिंगल युज प्लॅस्टिकवर बंदी घातली. पण बंदीची कुठलीही भीड, भीती दिसून येत नाही. राज्यातील कुठल्याही गावातील बाजारात फेरफटका मारला असता शासनाच्या या बंदीचा पुरता फज्जा उडाल्याचे चित्र आहे. मुळात शासनाने बंदी घातली म्हणून नव्हे तर पर्यावरणाचे संवर्धन, संरक्षण व्हावे यासाठी प्लॅस्टिकचा वापर बंद करणे अत्यावश्यक आहे. हा भाव प्रत्येकाच्या आचरणातून दिसायला हवा. प्लॅस्टिक वापराचे भयावह दुष्परिणाम वेळोवेळी दिसून पडतात. अगदी ५ जुलै २००५ किंवा २९ ऑगस्ट २०१७ या दिवशी राज्याची राजधानी असलेल्या मुंबई शहराची 'तुंबई' झाल्याचे आपल्या स्मरणात असेलच. नेहमीपेक्षा काही प्रमाणात अधिक झालेल्या पावसामुळे मुंबईत हाहाकार झाला होता. पण त्याचे मूळ कारण शहरातील पाणी वाहून नेणाऱ्या नाल्यांमध्ये साचलेले, अडकलेले प्लॅस्टिक होते. आपल्या संस्कृतीत गाईला मातेचा दर्जा दिला आहे. आता तर गाय ही आमची 'राज्यमाता' देखील आहे. पण हीच गोमाता गावात फिरताना प्लॅस्टिकच्या पिशव्यांमधील अन्नपदार्थ खाते आणि पोटात प्लॅस्टिक साचून तिचा जीव जातो. ज्या गाईला आपण माता म्हणून पूजतो ती गाय आपल्याच चुकीच्या कृतीमुळे हकनाक बळी जाते. मानवाला देखील प्लॅस्टिकमुळे अनेक समस्या व आजार होत असल्याचा निष्कर्ष तज्ज्ञांनी वेळोवेळी दिला आहे. प्लॅस्टिक उत्पादनात वापरल्या जाणारे विविध रासायनिक घटक कर्करोगाला कारणीभूत ठरतात. तर याच रासायनिक घटकांमुळे स्त्री-पुरूषांच्या प्रजनन क्षमतेवर परिणाम होतो. एवढेच नव्हे तर हृदयविकाराचा धोका देखील प्लॅस्टिकमुळे वाढत असल्याचे म्हटले जाते. अनेकदा प्लॅस्टिक जाळले जाते. त्यातून निघणाऱ्या विषारी वायूमुळे देखील कर्करोग होण्याची शक्यता असल्याचे मत तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.

कोरोना काळापासून आपण सर्वच आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत सतर्क झालो आहोत. त्यातही पिण्याच्या पाण्यातून होणाऱ्या संसर्गाबाबत तर अधिकच जागरूक आहोत. घराबाहेर असल्यास कुठलेही पाणी कसे प्यावे असा विचार करून आता पाण्याची बाटली विकत घेणे हे सहज झाले आहे. पण ज्या आरोग्याची काळजी म्हणून आपण पाण्याची प्लॅस्टिक बाटली विकत घेतो ती कितपत सुरक्षित आहे. याचा कधी विचार केला का? मध्यंतरी झालेल्या एका संशोधनात समोर आलेल्या माहितीनुसार पूर्णपणे बंद बाटलीच्या सरासरी एक लिटर पाण्यात सुमारे १ ते ४ लाख नॅनोप्लॅस्टिक्सचे अदृश्य तुकडे असू शकतात. कोलंबिया युनिव्हर्सिटी आणि रटजर्स युनिव्हर्सिटीच्या संशोधकांनी प्रोसिडिंग्ज ऑफ द नॅशनल अकॅडमी ऑफ सायन्सेसमध्ये प्रकाशित झालेल्या अभ्यासात ही निरीक्षणे नोंदवली आहेत. मुळात ज्या शुद्धतेसाठी बाटलीबंद पाणी आपण विकत घेतो त्या बाटलीतून आणि जेथे हे पाणी शुद्ध अर्थात फिल्टर केले जाते तेथूनच प्लॅस्टिकचे कण पाण्यात मिसळत आहेत. असे निरीक्षण संशोधकांचे आहे. माणसासह, पशू, पक्षी, गोमाता यांना जीवघेणे तर नदी, नाले, जलसाठ्यांसह पर्यावरणाला घातक ठरत आहे. तरीही प्लॅस्टिकची सतत वाढती मागणी चिंताजनकच म्हटली पाहिजे. शासनाने त्यावर बंदी आणली पण जोपर्यंत जनमनात याबाबत जागरूकता निर्माण होणार नाही तोपर्यंत प्लॅस्टिक प्रदूषण होतच राहील. या प्रदूषण निर्मूलनाकरिता समाजातील प्रत्येकाला पुढाकार घ्यावा लागेल.

९४२२८६२४८४

## दिल्ली वार्तापत्र


**श्यामकांत जहागीरदार**

# राहुल गांधी अकार्यक्षम विरोधी पक्षनेता

मागील आठवड्यात लोकसभेत एक घटना घडली. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची चांगलीच कानउघाडणी करीत त्यांच्या सभागृहातील पोरकट वागणुकीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. सदस्यांनी विशेषतः विरोधी पक्षनेत्यांनी सभागृहात वागताना मर्यादा आणि शालीनता यांना अनुसरून आपली वागणूक ठेवली पाहिजे, सदस्यांची वागणूक अनेक वेळा सभागृहातील उच्च परंपरा आणि मापदंड यांना अनुसरून नसते, हे अनेक उदाहरणांवरून माझ्या लक्षात आले आहे. सभागृहात पिता-पुत्री, आई-मुलगी, पती-पत्नी सदस्य राहिले आहेत. त्यामुळे सदस्यांनी सभागृहातील आपले आचरण संसदीय कामकाज नियमांच्या ३४९ नुसार राहील याचीही काळजी घ्यावी, असे ते म्हणाले.

यावर सभागृहात उपस्थित राहुल गांधी बोलायला उभे होताच ओम बिर्ला कामकाज स्थगित करीत आपल्या आसनावरून उठले. सुरुवातीला काय झाले, बिर्ला कोणाला उद्देशून हे बोलत आहे, हे कोणाच्या लक्षात आले नाही. बिर्ला यांचे रौद्ररूप पाहून काँग्रेसचे सदस्यही चकित झाले. राहुल गांधींच्या सभागृहातील नेमक्या कोणत्या वागणुकीवर बिर्ला नाराज झाले, ते सुरुवातीला कोणाला समजले नाही. कारण सभागृहात काही अनुचित घडल्याचे कोणालाच दिसले नव्हते.

सभागृहात बोलण्याचा प्रयत्न अपयशी ठरल्यानंतर राहुल गांधी यांनी सभागृहाबाहेर म्हणजे संसद भवन परिसरात अकांडतांडव केले. विरोधी पक्षनेते म्हणून मला सभागृहात बोलू दिले जात नाही, मी बोलायला उभा होताच माझ्यासमोरचा माईक बंद केला जातो, माझे म्हणणे ऐकले जात नाही, मी बोलायला उभा होताच सभागृहाचे कामकाज स्थगित करून अध्यक्ष निघून जातात, असे बरेच काही राहुल गांधी बोलले. त्यावर त्यांच्या आजूबाजूला उपस्थित काँग्रेसच्या खासदारांनी माना डोलावल्या. काही वेळातच भाजपा आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी समाज माध्यमावर एक व्हिडीओ जारी करत नेमके काय झाले, राहुल गांधींच्या सभागृहातील कोणत्या वागणुकीवर बिर्ला नाराज झाले, हे उघड केले. सभागृहाचे कामकाज सुरू असताना पाठीमागून येणाऱ्या राहुल गांधींनी वायनाडच्या काँग्रेस खासदार प्रियांका वढेरा यांच्या



गालावरून हात फिरवला. विशेष म्हणजे असा प्रकार सभागृहात पहिल्यांदा झाला नाही. याआधी अनेक वेळा झाला आहे. राहुल गांधींनी आपल्या लहान बहिणीचा लाड करण्यात गैर काही नाही; मात्र त्यांची बहिणीचा लाड करण्याची जागा चुकली. राहुल आणि प्रियांका हे बहीण-भाऊ आहेत, दोघांचे एकमेकांवर खूप प्रेम आहे, हेही सर्वांना माहीत आहे. तरीसुद्धा राहुल गांधी यांची सभागृहातील ही वागणूक सभापतीच नव्हे तर सर्वांना खटकणारी होती. तुम्ही आपल्या घरी वागता तसे सभागृहात वागू शकत नाही.

संसदेच्या दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेत्याचे खूप महत्त्व असते. आतापर्यंत अनेक नेत्यांनी विरोधी पक्षनेतेपद भूषवले, आपली छाप पाडली. सभागृहात अनेक वेळा विरोधी पक्षनेता सरकारवर हल्ला चढवतो, सभागृहातील कामकाजावरून अनेक वेळा त्याची सभापतींशीही वादावादी होते, पण यावेळी सभागृहात जे झाले ते अभूतपूर्व होते. विरोधी पक्षनेता बोलायला उभा होताच सत्ताधारी पक्ष अस्वस्थ होतो. आता आपल्यावर कोणत्या मुद्यावरून सरबत्ती होणार, असा प्रश्न त्यांना पडतो. पण राहुल गांधी बोलायला उभे होताच सत्ताधारी सदस्य रिलॅक्स होतात. कारण आपल्या हाताने आपले हसे करून घेण्यात राहुल गांधींचा हात कोणी धरू शकत नाही. जवळपास १० वर्षांच्या अंतराने काँग्रेसला लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपद मिळाले. २०१४ ते १९ या काळात लोकसभेत विरोधी पक्षनेता नव्हता, मल्लिकार्जुन खडगे काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. २०१९ ते २४ याही काळात काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळू शकले नाही. त्यावेळी अधीररंजन चौधरी काँग्रेस पक्षाचे गटनेते होते. लोकसभेत विरोधी पक्षनेतेपद मिळविण्यासाठी एकूण सदस्य संख्येच्या १० टक्के जागा जिंकणे आवश्यक असते. काँग्रेस पक्षाला एवढ्याही जागा तेव्हा जिंकता आल्या नव्हत्या. यावेळी काँग्रेस पक्षाला ९९ जागा जिंकता आल्या. त्यामुळे काँग्रेसला विरोधी पक्षनेतेपद मिळाले आणि काँग्रेसने विरोधी पक्षनेते म्हणून राहुल गांधी यांची निवड करीत हात दाखवून अवलक्षण करून घेतले.

लोकसभेत १९६९ पर्यंत विरोधी पक्षनेतेपद नव्हते. रामसुभगसिंह लोकसभेत पहिले विरोधी पक्षनेते होते. १९७० ते १९७७ या काळातही लोकसभेत विरोधी पक्षनेता नव्हता. जनता पक्षाचे सरकार आल्यानंतर यशवंतराव चव्हाण विरोधी पक्षनेते झाले. काही काळासाठी काँग्रेसचे सी. एम. स्टिफन विरोधी पक्षनेते झाले. त्यानंतर पुन्हा यशवंतराव चव्हाण विरोधी पक्षनेते बनले. चौधरी चरणसिंह पंतप्रधान असताना जगजीवनराम अल्पकाळासाठी म्हणजे फक्त २४ दिवसांसाठी विरोधी पक्षनेते होते. विश्वनाथ प्रताप सिंह पंतप्रधान असताना राजीव गांधी वर्षभरासाठी विरोधी पक्षनेते होते. भाजपाचे लालकृष्ण अडवाणी, अटलबिहारी वाजपेयी, सुषमा स्वराज यांनीही लोकभेतील विरोधी पक्षनेतेपद भूषविले. अडवाणी तर सर्वांत जास्त काळ लोकसभेचे विरोधी पक्षनेते होते. पी. व्ही. नरसिंहराव तसेच शरद पवार यांनीही विरोधी पक्षनेतेपद भूषविले. राजीव गांधी आणि पी. व्ही. नरसिंहराव आधी पंतप्रधान झाले, नंतर त्यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेतेपदाची जबाबदारीही सांभाळली. नरसिंहराव लोकसभेत सर्वांत कमी काळ म्हणजे फक्त १५ दिवस विरोधी पक्षनेते होते. अटलबिहारी वाजपेयी आधी विरोधी पक्षनेते होते, नंतर ते पंतप्रधान झाले. इंदिरा गांधी दीर्घकाळ पंतप्रधान होत्या, पण त्यांना विरोधी पक्षनेतेपदाची संधी कधी मिळाली नाही. यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम, स्टिफन, सोनिया गांधी, लालकृष्ण अडवाणी, शरद पवार, सुषमा स्वराज यांना विरोधी पक्षनेतेपदावरच समाधान मानावे लागले. पंतप्रधानपद त्यांना कधी मिळालेच नाही. नाही म्हणायला यशवंतराव चव्हाण, जगजीवनराम आणि लालकृष्ण अडवाणी उपपंतप्रधानपदापर्यंत पोहोचले होते, पण त्यांनाही पंतप्रधानपदाने हुलकावणी दिली. खरं म्हणजे विरोधी पक्षनेते म्हणून झालेली निवड ही राहुल गांधी यांच्यासाठी मोठी संधी आहे, पण या संधीचे सोने करण्याची त्यांची क्षमता नाही. मिळालेल्या प्रत्येक संधीची माती करण्याचे अफलातून कौशल्य राहुल गांधी यांनी आत्मसात केले आहे. त्यामुळेच काँग्रेस पक्षाच्या इतिहासातील सर्वांत अपयशी नेता, काँग्रेसचा राष्ट्रीय अध्यक्ष आणि आता विरोधी पक्षनेता अशी त्यांची नोंद इतिहासात होणार आहे आणि यासाठी भाजपा नाही तर ते स्वतःच जबाबदार ठरत आहे.

९८८१७१७८१७

## वाचक पत्रे

### संघ म्हणजे चैतन्य

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणजे जीवनातील एक महान चैतन्यच आहे.



संघजीवन म्हणजे एकप्रकारे साक्षात परमानंदच आहे. संघ म्हणजे 'हे माझे नाही, तुझे आहे' असे द्वितीय सरसंघचालक श्रीगुरुजींनी म्हटले आहे. खरेच जगात जे आहे ते दुसऱ्यांना देण्यासाठीच निर्माण झाले आहे. संघजीवनात चैतन्य आहे म्हणूनच जीवनात नैराश्य नाही. माझे जीवन दुसऱ्याच्या कामी पडावे असे वाटते. दुसऱ्याच्या सुख-दुःखात मी आहे हे संघजीवनातून शिकायला मिळते. एकटा मनुष्य म्हणून जीवन जगताना उदासपणा वाटेला येतो, पण चारचौघात मिसळून राहण्यात जो आनंद असतो त्याचे वर्णन शब्दांनी करता येणार नाही. संघजीवन म्हणजे संघटित जीवन. एकमेकांच्या हातात हात घालून सत्कर्म करण्यात जो आनंद आहे तोच खरा आनंद. रोज एकत्र येऊन प्रार्थना म्हणायची, विचारांचे आदानप्रदान करणे यातच खरा आनंद. तो आनंद संघाच्या नित्य शाखेतूनच मिळतो. म्हणून नित्य एक तास शाखेत गेले पाहिजे. समाज म्हणजेच राष्ट्र , भारत भूमीत हिंदू समाज एकाच संस्कारात वाढलेला आहे असा हा आपला भारत म्हणजेच हिंदू राष्ट्र आहे. हे हिंदू राष्ट्र आपले दैवत आहे. म्हणून हिंदू शक्तिशाली झाला पाहिजे. पर्यायाने संघ शक्तिशाली झाला पाहिजे. सर्वदूर हे ईश्वरी कार्य वाढले पाहिजे.

**मधुकर अमृत डबीर**/९८२२६१५३३१

●● ●●

### मानवनिर्मित समस्यांवर उपाय आवश्यक

काही दिवसांपूर्वी थायलंड आणि म्यानमारमध्ये भयानक भूकंप झाला. त्यात कित्येक लोकांना आपले प्राण गमवावे लागले, हजारो कोटी रुपयांचे नुकसान झाले, कित्येक इमारती पत्त्याच्या बंगल्यासारख्या कोसळल्या. काही देशात ज्वालामुखी, जंगलातील वणवे, पाऊस, पूर, रोगराई, भयानक थंडी, बर्फवृष्टी, कडक उन्हाळा अशा अनेक प्रकारच्या समस्या सातत्याने येत असतात. अशा नैसर्गिक आपत्तींमुळे त्या देशाचे अतोनात नुकसान होते. त्या नुकसानाची भरपाई करून पुन्हा पूर्वीची परिस्थिती आणण्यासाठी कित्येक वर्षे लागतात. एका संकटातून बाहेर यावे तर दुसरे संकट आ वासून उभे असते.

या पृष्ठभूमीवर भारतीय उपखंडातील देश नशीबवान आहेत. या देशात अशा नैसर्गिक समस्या अपवादानेच येतात. महापुरासारख्या संकटांमधून कायमस्वरूपी मुक्ती मिळवण्यासाठी केंद्र सरकारने नदी जोड प्रकल्पाला गती दिली आहे. वृक्षलागवडीसाठीही सरकार प्रयत्नशील आहे. अर्थात या देशांमध्ये नैसर्गिक समस्यांमुळे होणारे नुकसान नगण्य आहे. मात्र या देशांना मानवनिर्मित समस्यांनी ग्रासले आहे. भारत, पाकिस्तान, बांगलादेशांमध्ये, कोणीतरी स्वार्थासाठी सातत्याने कोणत्या ना कोणत्या तरी समस्यांना जन्म देऊन समाजात अशांतता, अस्थिरता निर्माण करतात. सत्तेसाठी धर्म, जातपात, पंथ, भाषा, प्रांत अशा मुद्यांवरून समाजात फूट पाडतात. देशात याच मुद्यांवरून तणाव निर्माण होतो. त्यातून हिंसक आंदोलने जन्म घेतात. सार्वजनिक संपत्तीचे नुकसान केले जाते. भारतासारख्या देशातही नैसर्गिक साधनसंपत्तीचा कोणताही तुटवडा नाही. येथील जनता कष्टकरी आहे, बुद्धिमान आहे, जागरूक आहे तरीही काही घटक आपापले स्वार्थ साधण्यासाठी समाजात अशांतता पसरवण्याचे महापाप करत असतात. प्रसारमाध्यमांकडून अशा मुद्यांना अवाजवी प्रसिद्धी दिली जाते. तेव्हा कोणीही कोणत्याही फुटकळ मुद्यांना महत्त्व देऊन स्वार्थासाठी समाजात अशांतता पसरवण्याच उपद्व्याप करू नये.

**शिवराम वैद्य**/९८५०५१८०१८

●● ●●

### पंतप्रधानांचे आगमन एक सुखद क्षण

गुढीपाडवाच्या शुभमुहूर्तावर देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची नागपूरची अविस्मरणीय भेट ही आमच्याकरिता आनंदाचीच पर्वणी असून भाजपाच्या सामान्य कार्यकर्त्यांचा सर्वोच्च सन्मान आहे. भाजपाचे ब्रीदवाक्य आमच्यासाठी प्रथम राष्ट्र, नंतर पक्ष व त्यानंतर स्वत: अशाप्रकारे कार्य अविरत सुरू असते. १९८० पासून भाजपाचे कार्य अविरत सुरू आहे. हे कार्य प्रामाणिकपणे करीत असताना रोज राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शाखेत जाऊन चांगले संस्कार मिळाले, या संस्कारातूनच आम्ही घडलो. भारतीय जनता पक्षात शिस्त, मानसन्मान, दिलेली जबाबदारी प्रामाणिकपणे करीत असताना त्या दिलेल्या पदाला न्याय दिला जातो आणि त्यामुळेच भाजपात कार्यकर्ता ते पदाधिकारी सर्वांचाच मानसन्मान होत असतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यातर्फे साधारण कार्यकर्त्यांचा आदर केला जातो, हीच आमच्यासाठी आनंदाची बाब आहे.

**आनंदबाबू कदम**/९८६०२०८७३७..

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१**
या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# मंत्री योगेश कदम यांचा आज जालना शहरात संवाद मेळावा



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

दि.४ रोजी जालना शहरातील स्वयंवर मंगल कार्यलय येथे महाराष्ट्र राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीमध्ये जालना जिल्हा शिव–सेनेच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक तसेच युवा विजय महाराष्ट्र संवाद मेळावा चे आयोजन करण्यात आले आहे.

आगामी काळात होऊ घातलेल्या महानगर पालिका ,जिल्हा परिषद , पंचायत समिती स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या पाश्वभूमीवर संघटना मजबुतीसाठी महाराष्ट्र दौरा निमित्ताने गृह व महसूल राज्यमंत्री योगेश कदम यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार अर्जुन खोतकर युवासेना सचिव अभिमन्यू खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जालना , बदनापूर , भोकरदन , परतूर या चार तालुक्यातील प्रमुख शिवसेना व सर्व शिवसेना अंगीकृत आघाड्याचे प्रमुख पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण संवाद मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे.या सवांद मेळाव्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन शिवसेना संपर्कप्रमुख पंडित भुतेकर,शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे शिवसेना जिल्हाप्रमुख ए.जे.बोराडे सहसंपर्क प्रमुख सुनील किनगावकर ,फेरोज लाला शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले , आत्मानंद भक्त , भास्कर मगरे ,सुयोग कुलकर्णी युवासेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर , शैलेश घुमारे , गणेश मोहिते यांनी आवाहन केले.

# विद्यार्थ्यांनी बौध्दीक, शारिरीक क्षमता वाढवून कौशल्य प्राप्त करावे –राज्यपाल हरिभाऊ बागडे

तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

बौध्दीक क्षमतेसाठी पाठांतर, वाचन आणि लिखाण चांगलेच झाले पाहिजे. नकला करुन काही फायदा होत नसते, तर माणूस हा मुळातच अभ्यासू असायला हवा. केवळ शिक्षण न घेता, कौशल्यपूर्ण शिक्षण ही काळाची गरज झाली आहे. हमखास रोजगार मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी बौध्दीक, शारिरीक क्षमता वाढवून कौशल्य प्राप्त करावे, असे प्रतिपादन राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांनी केले.

बदनापूर तालुक्यातील आन्वी येथे पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेच्या संत श्री भगवानबाबा आश्रम शाळेच्या वसतिगृह भूमिपूजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी पालकमंत्री पंकजा मुंडे, जिल्हाधिकारी



डॉ. श्रीकृष्ण पांचाळ, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, संस्थाध्यक्ष देवेंन पटेल, उद्योजक सुनिल रायठठ्ठा यांची प्रमुख उपस्थिती होती.

पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्थेची २८ वर्षापासून ही शाळा अविरतपणे सुरु आहे. आन्वी येथील आश्रम शाळेत परिसरातील मुले शिकत असतात. नवीन वसतिगृहाच्या भूमिपुजनानंतर आता एका वर्षाच्या कालावधीत नवीन वसतिगृहाची इमारत बांधून तयार होईल. संत श्री भगवानबाबांच्या संदेशानूसार जीवन जगत असतांना दुसऱ्यांनाही आपण मदत केली पाहिजे, याच उदात्त हेतुतून संस्थेची वाटचाल सुरु आहे. विद्यार्थी दशेत चपळता ही महत्वाची आहे. आता मुलींनी अबला न राहता सबला झाले पाहिजे. मुलींनी आजच्या काळात शारिरीक व बौध्दीक क्षमता वाढवावी. पाठ्यपुस्तका व्यतिरिक्त अवांतर पुस्तके वाचुन ज्ञानाचा साठा वाढवावा. तसेच शिक्षकांनीही मुलांना ज्ञानदानाचे काम सुयोग्य करावे. असेही त्यांनी यावेळी सांगितले. शिक्षक हे आपल्या जीवनात ज्ञानदानाचे पवित्र कार्य करत असतात. गुरु कधीही मुलांवर वाईट संस्कार करत नसतात. योग्य ती वाट दाखविण्याचे कार्य हे गुरुवर असते. तर दाखविलेल्या योग्य वाटेवर चालण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांची असते. आणि स्वत:च्या मनावर ताबा ठेवत, जो संस्कार गृहण करतो तोच जीवनात यशस्वी होत असतो. तरी मराठी शाळेतूनच संस्कारक्षम माणसे निपजली जातात, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती पंकजा प्रज्ञा गोपीनाथ मुंडे यांनी केले. पालकमंत्री श्रीमती मुंडे म्हणाल्या की, मराठी शाळेत संस्कारक्षम पिढी घडविण्याची सक्षमता आहे. जिल्हाधिकारी, शासकीय अधिकारी, मंत्री पदापर्यंत झेप घेतलेल्या व्यक्तींचे शिक्षण हे मराठी शाळेमधूनच झाल्याचे आपल्याला दिसून येईल. संघर्षामधूनच इतिहास घडत असतो, त्यामुळे शॉर्टकट वापरुन पुढे जाण्याचा विचारसुध्दा मनात येवू देवू नका. मैदानी खेळ खेळा, शिक्षण घ्या आणि आपले जीवन यशस्वी करा असेही त्यांनी सांगितले. आज गावच्या गावे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचा लाभ घेत आहेत, या माध्यमातून महिलांना आर्थिक बळ देण्याचे काम शासनाने केले आहे. या कार्यक्रमास ग्रामस्थ, पदाधिकारी, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त

### श्री गणपती नागरी सहकारी पतसंस्थेला रु.९१ लाख ३७ हजार ८६९ रुपये नफा –चेअरमन राजाभाऊ देशमुख



तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

येथील श्री गणपती नागरी सहकारी पतसंस्था म.भोकरदन या संस्थेला दि. ३१ मार्च २५अखेर रु.९१ लाख ३७ हजार ८६९ रुपये एवढा नफा झाल्याचे पतसंस्थेचे चेअरमन राजाभाऊ देशमुख यांनी सांगितले.

श्री गणपती नागरी सहकारी पतसंस्था म.भोकरदन या संस्थेकडे दिनांक ३१मार्च २०२५ अखेर एकुण ठेवी रु.६२ कोटी ५५ लाख ८४ हजार ७२६ रुपये जमा असून एकूण निधी रु.८ कोटी ७१ लाख ६९ हजार ९३ रुपये आहे.पतसंस्थेने एकुण गुंतवणूक रु.२७ कोटी ३१ लाख २६ हजार ३११ रुपये केलेली असून एकुण कर्ज वाटप रु.४४ कोटी ०९ लाख ८६ हजार ८०१ रुपये केले असल्याचे राजाभाऊ देशमुख यांनी सांगितले यावेळी पतसंस्थेने संस्थेच्या खातेदारांना ठढ्ञ्ब्/छ्एञ्ढ सुविधा उपलब्ध करून दिली असून संस्थेला जालना जिल्हा कार्यक्षेत्र वाढ परवानगी मिळालेली असून येणाऱ्या पुढील काही दिवसात संपूर्ण जालना जिल्ह्यामध्ये पतसंस्थेच्या शाखा सुरू करण्याचा पतसंस्थेच्या संचालक मंडळाचा मानस असल्याचे मत पतसंस्थेचे चेअरमन देशमुख यांनी यावेळी व्यक्त केले .

पतसंस्थेच्या या यशामध्ये संचालक मंडळ ,सभासद,खातेदार ,कर्मचारी यांचा सहभाग असल्याचे यावेळी देशमुख म्हणाले.यावेळी पतसंस्थेचे व्हा.चेअरमन हुकुमसिंह चुन्डावत यांच्यासह संचालक मोहनसेठ हिवरकर,अमृतराव देशमुख,शेख गणी शेख भिकन, इंद्रजित देशमुख श्रीमती नंदा खरात , पंडित रोजेकर,करणसिंग डोभाळ,सौ.सरोज जैन,सौ.योगिता देशमुख,सरव्यवस्थापक अंकुश सुरासे तसेच संस्थेचे सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते.



### ग्राम कृषी विकास समिती व स्वयंसेवक यांचे ऑनलाईन प्रशिक्षण संपन्न

तभा वृत्तसेवा
तळणी/प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील तळणी येथे नानाजी देशमुख कृषी संजीवनी योजनेअंतर्गत निवड झालेल्या तळणी गावाचे ग्राम कृषी विकास समिती व स्वयंसेवक यांचे ऑनलाईन प्रशिक्षण दिनांक २ एप्रिल रोजी संपन्न झाले. सदर कार्यक्रमास सरपंच गौतम सुदाम सदावर्ते ग्रामविकास अधिकारी श्री डोईफोडे तलाठी श्री वानुळे श्री हरिश्चंदे ग्राम कृषी विकास समिती सदस्य खोडके साहेब ग्रामपंचायत सदस्य पत्रकार बंधू उपस्थित होते.

### आ.राजेश राठोड यांची जिल्हा काँग्रेस कमिटीच्या निरीक्षकपदी नियुक्ती



तभा वृत्तसेवा
परतूर/प्रतिनिधी

जिल्हा व शहर काँग्रेस कमिटीचे निरीक्षक म्हणून आमदार राजेश राठोड व माजी खासदार तुकाराम रेंगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्या निर्दशननुसार पक्ष बळकट करण्यासाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीने निरीक्षकांची नियुक्ती केली आहे यामध्ये महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व विधान परिषदेचे प्रतोद आमदार राजेश राठोड यांची व माजी खासदार महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष तुकाराम रेंगे पाटील यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष खासदार डॉ. कल्याणराव काळे व शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख युसूफ, किरण पाटील डोणगावकर, अनिस पटेल यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. ५ एप्रिल नंतर पक्ष कार्यालय गांधी भवन येथे निरीक्षक मीटिंग घेणार आहेत

# अकोलीच्या सरपंच पतीवर अज्ञातांकडुण जीवघेणा हल्ला

तभा वृत्तसंस्था
जालना/प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील मौजे आकोली येथील कर्तव्यनिष्ठ महिला सरपंच सौ .पल्लवी सोळंके यांचे पती ज्ञानेश्वर सोळंके यांच्यावर अज्ञातांनी सेलु रोडवर सकाळच्या वेळी एकटेपणाचा फायदा घेत त्यांच्यावर जीव–घेणा हल्ला केला.

सदरील घटना सेलू–आष्टी रस्त्यावरील नायरा पेट्रोल पंपा जवळील पुलावर बुधवारी सकाळी ११ वजेच्या दरम्यान घडली. ज्ञानेश्वर सोळंके (वय ३७) हे सेलूहून आष्टीकडे कारने (एम एच ३७ व्ही. ५७६७) ५७६७) जात होते. दरम्यान,



पावडे हादगाव जवळील पुलावर तीन दुचाकीवरील चार ते पाच जणांनी सरपंच पती श्री .ज्ञानेश्वर सोळंके यांना अडवून लोखंडी सळई व लाथा बुक्याने हल्ला चढविला. यात पायांना जबर मार लागून एक पाय फॅक्चर झाला आहे. ज्ञानेश्वर सोळंके यांच्यावर जालना येथे उपचार सुरू आहेत. मात्र अकोली गावातील ग्रामस्थांकडुण संबंधीत हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हे दाखल करण्यात यावेत व त्यांना तात्काळ अटक करण्यात यावी तसेच योग्य तशी कार्यवाही करण्याची मागणी होत आहे .

# भोकरदन येथे बौद्ध समाजाच्या वतीने महाबोधी महाविहार ताब्यात देण्यासाठी मोर्चा

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी



बोधगया महाबोधी विहाराचा १९४९ चा कायदा रद्द करावा तसेच विहार बुद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावा या मागणीसाठी मंगळवारी भोकरदन येथील उपविभागीय अधिकारी कार्यालयावर समाज बांधवांच्या वतीने महामोर्चा आंदोलन करण्यात आले. बौद्ध समाज बांधवांच्या वतीने उपविभागीय अधिकाऱ्यामार्फत राष्ट्रपतींना मागण्याचे निवेदन देण्यात आले. बोधगया महाविहार १९४९ चा कायदा रद्द करण्यात यावा, महाबोधी महाविहाराचे नियंत्रण बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावे. बोरगाव तारू येथील विकास बनसोडे यांच्या कुटुंबाला मारहाण करणाऱ्या आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, पळसखेडा पिंपळे येथील रत्नदीप गुलाबराव भांबळे यांच्या हत्येचा तपास सीबीआयमार्फत करण्यात यावा, सुभानपूर येथील पुतळा इतर ठिकाणी स्थलांतरित करण्यात यावा यासह इतरमागण्यांचे निवेदन देण्यात आले. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे जिल्हाध्यक्ष राजेश सदावर्ते, भारतीय बौद्ध महासभेचे तालुकाध्यक्ष सूर्यभान घोरपडे, समता सैनिक दलाचे मिलिंद मगरे, नगरसेवक दीपक बोर्डे, सामाजिक कार्यकर्ते प्रदीप जोगदंडे, सामाजिक कार्यकर्ते सचिन पारखे, वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष विशाल मिसाळ, वंचितचे महासचिव मंगेश पगारे, वंचितचे ग्रामीण महासचिव पंडित घोरपडे, वंचित तालुका उपाध्यक्ष विजय सावंत, जाफराबाद तालुका वंचित बहुजन आघाडीचे महासचिव सर्जेराव हिवाळे, पत्रकार कमलकिशोर जोगदंडे, पत्रकार सुरेश बनकर, पत्रकार युवराज पगारे, पत्रकार राजू राऊत, युवा नेते नितीन मस्के, नितीन जोगदंडे, राजपाल पारखे, विजय पगारे, संदेश जोगदंडे, सागर साळवे आदींची उपस्थिती होती.

# घनसावंगीत सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली भाजपचे संघटन पर्व

## रावसाहेब दानवे यांच्या उपस्थितीत तालुकाध्यक्ष निवडीसाठी बैठक

तभा वृत्तसेवा
अंबड/प्रतिनिधी

दि ३१ मार्च देशाचे माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या अध्यक्षतेखाली घनसावंगी विधानसभेत भाजपाच्या 'संघटन पर्व' अंतर्गत तीन मंडळात तालुका अध्यक्ष निवडीठी बैठक घेण्यात आली. हजारो भाजप कार्यकर्त्याच्या उपस्थितीत घनसावंगी येथे भाजपा नेते सतीश घाटगे पाटील निवासस्थानी ही बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीस जिल्हा निवडणूक अधिकारी भास्कर दानवे, भाजपा नेते सतीश घाटगे पाटील, जिल्हाध्यक्ष बद्रीनाथ पठाडे, माजी जिल्हाध्यक्ष रामेश्वर भांदर्गे, भाजपचे ज्येष्ठ नेते विलासबापू खरात, मावळते तालुका अध्यक्ष शिवाजीराव बोबडे, बाबुराव खरात, भाजपचे महामंत्री सिद्धीविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष जितेंद्र पालकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

भाजपने नुकतेच राज्यभरात सदस्य नोंदणी अभियान राबविले. या अभियानात सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली ३५ हजार नवीन सदस्य नोंदणी करण्यात आली. घनसावंगी विधानसभेत भाजपचे पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या सूचनेनुसार मतदारसंघात नवीन मंडळ रचना तयार करण्यात आली. या मंडळासाठी स्वतंत्र



तीन तालुका अध्यक्षांची निवड करण्यसाठी घन्सावंगीत १ एप्रिल रोजी बैठक घेण्यात आली. या बैठकीत इच्छुक उमेदवाराकडून उमेदवारी अर्ज भरून घेण्यात आली लवकरच घनसावंगी मतदार संघातील तिन्ही मंडळाच्या तालुका अध्यक्षाची निवड जाहीर करण्यात येणार असल्याची माहिती सतीश घाटगे यांनी दिली. हजारो भाजप कार्यकर्त्याच्या उपस्थितीत घनसावंगी विधानसभेतील तीन मंडळाचे उमेदवारी अर्ज जिल्हा निवडणूक अधिकारी भास्कर दानवे पाटील यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. याप्रसंगी रावसाहेब दानवे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या दृष्टीने मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच भास्कर दानवे यांनीही पक्ष वाढीसाठी मार्गदर्शन केले. घनसावंगी तालुक्यातील मच्छिंद्रनाथ चिं–चोली जिल्हा परिषद गटाचे जिल्हा परिषद सदस्य श्री. जीवनराव वगरे यांनी आपल्या समर्थकांसह मा. सतीश घाटगे साहेब यांच्या नेतृत्वाखाली भाजपात जाहीर प्रवेश केला. केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या हस्ते त्यांनी पक्ष प्रवेश केला. याप्रसंगी त्यांचा रावसाहेब पाटील दानवे व सतीश घाटगे साहेबांनी सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# पालकमंत्री पंकजाताई यांचे जालन्यात संपर्क कार्यालय सुरु करून १५ दिवसाला भेट द्यावी - अरविंद देशमुख



तभा वृत्तसेवा
जालना/प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कार्यालयात पालकमंत्री पंकजाताई मुंडे यांचे अधिकृत संपर्क कार्यालय स्थापन करण्यात यावे आणि त्यांनी पंधरा दिवसांतून एकदा या कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या समस्या जाणून घ्याव्यात, अशी मागणी मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी केली आहे.

अरविंद देशमुख यांच्या नेतृत्वाखालील मराठा महासंघाच्या शिष्टमंडळाने मंगळवार दि. १ एप्रिल रोजी जिल्हाधिकाऱ्यांमार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पाठवलेल्या निवेदनात म्हटले आहे की, जिल्ह्यातील नागरिकांना शासकीय कामांसाठी वारंवार जिल्हाधिकारी कार्यालय व अन्य प्रशासकीय कार्यालयांना भेट द्यावी लागते. त्यामुळे त्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी आणि शासन–प्रशासन यांचा समन्वय वाढवण्यासाठी पालकमंत्र्यांचे संपर्क कार्यालय स्थापन होणे आवश्यक आहे. पालकमंत्र्यांचे निश्चित संपर्क कार्यालय नसल्याने नागरिकांना थेट संवाद साधण्यास अडचणी येतात. त्यामुळे हे कार्यालय स्थापन झाल्यास प्रशासन अधिक पारदर्शक होईल आणि शासकीय योजनांची अंमलबजावणी गतिमान होईल. पालकमंत्र्यांनी पंधरा दिवसांतून एकदा कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारी ऐकाव्यात व त्यावर उपाययोजना कराव्यात, अशीही मागणी असेही देशमुख यांनी केली आहे. या निवेदनावर जिल्हा सरचिटणीस संतोष कऱ्हाळे, जिल्हा कोषाध्यक्ष अशोक पडूळ, जिल्हा उपाध्यक्ष सुभाष चव्हाण, युवा जिल्हाध्यक्ष ड. शैलेश देशमुख, विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष इंजि. शुभम टेकाळे, कामगार आघाडीचे मंगेश मोरे, जिल्हा संघटक अजय कोल्हे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शहीद जवान किरण भांबळे यांच्यावर शासकीय इतमामात अंत्यसंस्कार

## वीरपुत्र स्व.किरण भांबळे कुटुंबियांच्या दु:खात सहभागी –आमदार संतोष पाटील दानवे

तभा वृत्तसेवा
भोकरदन/प्रतिनिधी

भारतीय सैन्य दलात कार्यरत असलेले वीर जवान स्व. किरण भांबळे मुलाच्या वाढदिवसासाठी गावाकडे डोलखेडा बु. येथे आले होते. आठ दिवसापूर्वी चिखलीकडे जात असताना देऊळगाव घुबे फाट्याजवळ दुचाकी अपघातात डोक्याला जबर मारुन लागून उपच–ारादरम्यान मृत्यू झाल्याची दुर्देवी घटना मंगळवारी (दि.१) रोजी घडली. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. दरम्यान, मृत वीर जवान स्व. किरण भांबळे यांच्यावर डोलखेडा बु येथे शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांनी अमर रहे... अमर रहे.. किरण भांबळे अमर रहे अशा घोषणा देत अखेरचा



निरोप दिला.

डोलखेडा येथील जवान किरण भास्कर भांबळे हे सन २०१५ १६ मध्ये –भारतीय सैन्य दलात भरती झाले होते. ते दिल्ली येथील सतरा माहार बटालीयीनमध्ये कार्यरत होते. काही दिवसांपूर्वी ते एका महिन्याच्या सुट्टीवर डोलखेडा येथे आपल्या गावी आले होते. सुट्टीचे दिवस आनंद घलवत असतानाच आठ दिवसांपूर्वी देऊळगांव घुबे (ता. चिखलीग येथील धनश्री बँकेच्या गोडाऊन जवळ त्यांचा दुचाकीला अपघात झाला होता. यामध्ये जवान किरण भांबळे यांच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथे खाजगी रुग्णालयात उपचार सुरू होते. परंतु उपचारा दरम्यान दिः १ एप्रिल रोजी त्यांची प्राणज्योत माळवली. आज सकाळी शासकीय वाहनातून त्यांचे पार्थिव डो–लखेडा येथे आणण्यात आले. यावेळी आमदार संतोष पाटील दानवे यांनी वीर जवान स्व. किरण भांबळे यांनी अंतिम दर्शन घेऊन पुष्पचक्र अर्पण केले. आणि भाबळे कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी असून आगामी काळात भांबळे परिवाराला काही अडचण असल्यास आम्ही ठामपणे उभे राहू असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला. यावेळी शोकाकूल ग्रामस्थांनी जवान किरण भांबळे अमर रहे... अमर रहे.. अशा घोषणा देत यावीर जवानाच्या स्मृती मनात ठेवत साश्रुनयनांनी अखेरची मानवंदना दिली. तर सैन्य दलाच्या जवानांनी हवेत बंदुकांच्या तीन फैरी झाडत शहीद जवान भांबळे यांना अखेरची सलामी दिली. जवान किरण भांबळे यांच्या पश्चात आईवडील पत्नी एक मुलगा, असा परिवार आहे. तहसीलदार सारीका भगत, सहायक निरीक्षक सचिन खामगळ, चेअरमन विजयनाना परीहार, भाजपा तालुकाध्यक्ष नाना भागीले, शालीकराम पा.म्हस्के, विजय परीहार, राष्ट्रवादीचे दत्तू अंभोरे, सरपंच विनोद राऊत यांच्यासह डोलखेडासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# शहरातील काही भागात जाणीवपूर्वक नळाद्वारे पिण्याच्या पाण्याची नासाडी

## नगर पालिकेकडून अशा लोकांवर कारवाई करण्याची मागणी





**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

उन्हाळ्यात अनेक गावांमध्ये एक हंडा पाण्यासाठी महिलांना भटकंती करावी लागत आहे. अनेक गावे पिण्याच्या पाण्यासाठी तरसत असतांना हिंगोली शहरातील काही भागात नगर पालिकेमार्फत नळाद्वारे सोडलेल्या पाण्याची चक्क नासाडी होत असतांना आणि पाणी नाल्यांमध्ये सोडून देतांना दिसत आहे. अशा लोकांवर कडक कार्यवाही करण्याची मागणी जागरूक नागरिकांमधून होत आहे.

जिल्ह्यात उन्हामुळे तलाव, नदी, ओढे तसेच बोअर, विहीरी आदी पाण्याचे स्त्रोत आटत आहेत. जमिनीतील पाणीपातळी कमी झाली आहे. अनेक गावांना तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. काही गावांमध्ये महिलांना हंडाभर पाण्यासाठी एक ते दोन किमीपर्यंत पायपीट करावी लागत आहे. काही ठिकाणी टँकरने पाणीपुरवठा होत आहे. एकीकडे ग्रामीण भागात पाण्याचे भीषण संकट निर्माण झाले असतांना हिंगोली शहरात मात्र हजारो लिटर पाणी नळाला तोटी नसल्यामुळे वाया जात असतांना दिसत आहे.

तीन दिवसांपूर्वी सिध्देश्वर येथील पंप हाऊसला आग लागल्यामुळे तेथील केबल आगीमध्ये जळून खाक झाले होते. नगर पालिकेचे मुख्याधिकारी अरविंद मुंढे, अभियंता वसंत पूतळे, स्वच्छता निरीक्षक बाळू बांगर यांनी तत्काळ या पंप हाऊसला भेट देत तांत्रिक बिघाड अवघ्या दोन दिवसात दूर करीत शहराला पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी प्रयत्न केले.

गुरूवारी डिग्रस कऱ्हाळे येथील जल शुध्दीकरण केंद्रातून शहरातील पिण्याच्या पाण्याच्या टाक्या भरण्यात आल्या. त्यामुळे शहरातील काही भागात नगर पालिकेमार्फत नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात आला. पाणी भरणे झाल्यानंतर काही भागात नळाला तोट्या बसविल्या नसल्यामुळे या भागातील नळाद्वारे हजारो लिटर पाण्याची नासाडी होतांना दिसत होते. काहीजणांनी पाणी नाल्यात सोडले तर काही जणांनी नळाचे पाणी रस्त्यावर सोडून दिले होते.

एकीकडे उन्हाच्या तीव्रतेमुळे पाण्याची भीषण टंचाई भासत असतांना अशाप्रकारे नळातून हजारो लिटर पाणी वाया जात असल्यामुळे पाण्याचा अपव्यय होत असतांना दिसत आहे. जाणीवपूर्वक काही भागात नळाद्वारे पिण्याचे पाणी वाया घालवत आहेत की काय असा प्रश्न निर्माण होत आहे. नगर पालिका प्रशासनाने शहरातील नळांना तोट्या बसविण्यासाठी मोहीम उघडणे गरजेचे असून जाणीवपूर्वक असे करणाऱ्याचे नळ कनेक्शन तोडून त्यांना दंड आकारावा अशी मागणी जागरूक नागरिकांमधून होत आहे.

# जिजाऊ रथयात्रेच्या स्वागतासाठी विविध समित्या



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

मराठा सेवा संघ संचलित मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ रथयात्रा २०२५ विविध जिल्हयातुन प्रवास करीत शुक्रवार दि.४ एप्रिल रोजी जिल्हयात येणार आहे. या रथयात्रेच्या तयारीकरिता विविध समित्यांची स्थापना करण्यात आली असुन जबाबदारीचे वितरण करण्यात आले आहे.

मराठा सेवा संघ व कक्षाद्वारे दि.१८ मार्च रोजी पासुन भोसले गढी (वेरुळ) ते १ मे २०२५ लाल महाल पुणे दरम्यान ४५ दिवसाची जिजाऊ रथ यात्रा निघालेली आहे. विविध जिल्हयामधुन प्रवास करीत हिंगोली जिल्हयात दि.४ एप्रिल रोजी जिजाऊ रथयात्रेचे आगमन होणार आहे. सेनगाव येथे दुपारी ४ वाजता, नर्सी नामदेव येथे ५ वाजता, यानंतर हिंगोली येथे सायंकाळी ६ वाजता ही यात्रा येणार आहे. जिजाऊ रथयात्रेच्या स्वागत हिंगोली येथे अग्रसेन चौक येथे करुन छत्रपती शिवाजी महाराज पुतळा परिसरातुन भव्य मिरवणुक काढण्यात येणार आहे. यात्रेमध्ये शिवशंभो ढोलपथक, वारकरी, महिला भगिंनी यांच्यासह सर्व जाती धर्मातील नागरिक सहभागी होणार आहेत. या अनुषंगाने हिंगोली येथील शासकीय विश्रामगृहात मराठा सेवा संघ, जिजाऊ ब्रिगेड, संभाजी ब्रिगेड व सर्व कक्षाच्या वतीने मंगळवार दि.१ एप्रिल रोजी तयारी आढावा बैठक घेण्यात आली. यामध्ये विविध समित्या व जबाबदारीचे वितरण करण्यात आले. स्टेज साऊंड, बिछायत, हार, स्मरणीका, पुष्पगुच्छ पंडित सिरसाट, सुधाकर बल्लाळ, विविध परवानग्या मनोज आखरे, कल्याण देशमुख, शिवाजी ढोकर पाटील, राजकुमार वायचाळ, जमा खर्च हिशोब राजकुमार वायचाळ, ज्योती कोथळकर, निवास व्यवस्था, भोजन व नाश्ता कल्याण देशमुख, शिवाजी ढोकर पाटील, प्रसिद्धी पत्र छपाई व वितरण पंडित अवचार, पंडित सिरसाट, विकास प्रेस, गजानन ठिकणे, सुधाकर बल्लाळ, प्रसिद्धी समिती गजानन मगर, कल्याण देशमुख, पंडित अवचार, फलक लावणे शिवराज सरनाईक, महेश राखोंडे, गजानन ठिकणे, रथयात्रे सोबत व्यवस्था मनोज आखरे, खंडेराव सरनाईक, डॉ.नामदेव कोरडे, शिवाजी ढोकर पाटील, साधना हेंबाडे, सुनिता मुळे, तालुकास्तरावर बैठका-पंडित अवचार, मनोज आखरे, शिवाजी ढोकर पाटील, राजकुमार वायचाळ, मान्यवरांशी संपर्क व सहभाग वाढ मनोज आखरे, पंडित अवचार, खंडेराव सरनाईक, शिवाजी ढोकर पाटील, बैठक व्यवस्था माधव जाधव, सुधाकर बल्लाळ, राजकुमार वायचाळ, शिवशंभो ढोल पथक व ध्वज उभारणी कल्याण देशमुख, मिरवणुक वारकरी पथक दिंडी बालाजी वानखेडे, मनोज आखरे, महापुरुषांना पुष्पहार खंडेराव सरनाईक, माधव जाधव, विश्वास वानखेडे, बालाजी वानखेडे, ध्वजपथक व विद्यार्थी सहभाग माधव जाधव, सुधाकर बल्लाळ, डॉ.प्रकाश अंभोरे, हरिभाऊ मुटकुळे, मिरवणुकीतील जनरेटर व साऊंट सिस्टीम हरिभाऊ मुटकुळे, अतिषबाजी बाबाराव श्रृंगारे, मिरवणुक इतर व्यवस्था गजानन जाधव, सुधाकर बल्लाळ, राजकुमार वायचाळ, माधव जाधव, विश्वास वानखेडे, मुख्य स्टेज गजानन जाधव, विकास कल्याणकर, चहापाणी व्यवस्था लक्ष्मणराव शिंदे, महारुद्र गायकवाड, गोपाल भोस, गजानन मगर, महिलाचा सहभाग वाढविणे सुनिता मुळे, ज्योती कोथळकर, वंदना आखरे, साधना हेंबाडे, कांताबाई कल्याणकर, सिमा वडदकर, अरुणा अंभोरे, अर्चना मेटे, स्वाती नायकवाल, देशमुख ताई, शितल कल्याणकर, भोयर ताई आदी. सुत्रसंचलन पंडित अवचार, नितीन इंगळे, हरिभाऊ मुटकुळे, पंडित सिरसाट आदी समित्यांची स्थापना करुन जबाबदारीचे वितरण करण्यात आले. या बैठकीला पदाधिकारी व सदस्य, महिला भगिंनी मोठया संख्येने उपस्थित होते.

# मुलींनो बालविवाहाला कडाडून विरोध करा- अंजली रमेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

मुलींना बालविवाहाचे मोठे दुष्परिणाम भोगावे लागतात. त्याचे बाल मनावर आणि भावी आयुष्यात वाईट परिणाम होत असतांना दिसत आहेत. त्यामुळे स्वत: मुलींनीच पुढाकार घेत बालविवाहाला कडाडून विरोध केला पाहीजे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी एका कार्यक्रमाप्रसंगी केले.

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथे ग्रामपंचायत व महिला बालविकास विभागाच्यावतीने आयोजित मिशन सक्षम बालिका बालविवाह जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी अंजली रमेश यांनी विविध शाळेतील विद्यार्थीनींसोबत जमिनीवर बसून त्यांच्याशी संवाद साधला. यावेळी सरपंच स्वाती अंभोरे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अनुप शेंगुलवार, प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी गणेश वाघ, केशव गड्डापोड, महिला बालविकास अधिकारी रामभाऊ मगर, माजी सभापती मुनीर पटेल आदींची उपस्थिती होती.

यावेळी मुलींशी संवाद साधतांना अंजली रमेश म्हणाल्या की, मुलींनी शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले पाहीजे, इच्छीत ध्येय प्राप्त करण्यासाठी शिक्षण जरूरी आहे. शिक्षणामुळेच प्रगती होऊन सर्व क्षेत्रात काम करण्याची संधी मिळते. यावेळी बालविवाहाबद्दल मुलींची मते जाणून घेतली. यावेळी विद्यार्थीनींनी अंजली रमेश यांच्याशी मनमोकळेपणाने संवाद साधला.

यावेळी ग्रामविकास अधिकारी गजानन डुकरे यांनी बालविवाह रोखण्यासाठी प्रतिज्ञा दिली. विद्यार्थीनींनी बालविवाहावर पथनाट्य सादर केले.

## संक्षिप्त वृत्त

### श्रीराम कथास्थळी दररोज महाप्रसादाचे वाटप

हिंगोली- महामंडळेश्वर श्री श्री १००८ प.पु.माँ कनकेश्वरी देवींजी यांच्या मधुर वाणीतुन श्रीराम कथा ज्ञानयज्ञ मागील चार दिवसापासुन सुरु आहे. कथास्थळी हजारो भाविकांना कथा संपल्यानंतर दैनंदिन महाप्रसादाचे वितरण श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे. महाप्रसाद तयार करण्याची जबाबदारी गायत्री परिवाराने घेतली आहे. हिंगोली येथील दत्तमंदिर परिसरात माँ कनकेश्वरी देवीजी यांच्या मधुर वाणीतुन श्रीराम कथा ज्ञानयज्ञ रविवार दि.३० मार्च रोजीपासुन सुरु झाला आहे. श्रीराम कथा ज्ञानयज्ञानंतर हजारो भाविकांना दैनंदिन महाप्रसादाचे वितरण श्री त्रिशुल नवदुर्गा महोत्सव समितीच्या वतीने करण्यात येत आहे. या महाप्रसादाची तयार करण्याची जबाबदारी गायत्री परिवाराने घेतली आहे. दैनंदिन अडीच ते तीन हजार भाविकांना गेल्या चार दिवसापासुन महाप्रसाद वितरीत करण्यात आला आहे. दिवसेंदिवस भाविकांची संख्या वाढत असल्यामुळे महाप्रसादाचे वितरणही दैनंदिन वाढत आहे. दररोज वरण, भात, पोळी, भाजी व एक गोड पदार्थ जेवणामध्ये वितरीत करण्यात येत आहे. या महाप्रसादाचे निर्माण शुद्ध तुपात व स्वच्छ पद्धतीने आचार्यांच्या मदतीने तयार करण्यात येत आहे. हजारो भाविक महाप्रसादाचा लाभा घेत आहेत.

### आज विभागीय पोलिस तक्रार प्राधिकरणतर्फे चौकशी शिबीराचे आयोजन

हिंगोली- विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण छत्रपती संभाजीनगर तर्फे हिंगोलीतील जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात ४ एप्रिल शुक्रवार रोजी सकाळी ११ वाजता चौकशी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या चौकशी शिबिरात हिंगोली जिल्ह्यातील विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण यांच्याकडे प्राप्त झालेल्या चौकशीची सुनावणी होणार आहे.विभागीय पोलीस तक्रार प्राधिकरण हे सामान्य नागरिकांना पोलिसांकडून होणाऱ्या बेकायदेशीर त्रासाबाबत न्याय देण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार महाराष्ट्र शासनाच्या गृह विभागाचे प्राधिकरण आहे. या प्राधिकरणाचे कामकाज महाराष्ट्र पोलीस कायद्यातील कलम २२ नुसार चालते. तसेच नागरिकांच्या तक्रारी सुद्धा स्वीकारल्या जाणार आहेत त्यामुळे नागरिकांनी या चौकशी शिबिरात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तक्रारकर्त्यांची छत्रपती संभाजी नगर पर्यंतची होणारी ये जा टाळण्याकरता तसेच त्यांचा आर्थिक भुर्दंड टाळण्यासाठी हे शिबिर घेण्यात येणार आहे. सकाळी ११ ते चार वाजेपर्यंत शिबिर घेण्यात येणार आहे. सदरील शिबिर प्राधिकरण चे अध्यक्ष मिलिंद बिलोलीकर यांच्या उपस्थितीत घेण्यात येणार आहे या शिबिरामध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन देखील करण्यात आले आहे.

### ३६ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कार्यवाही

हिंगोली- अवैध वाहतुक करणारे तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ३६ वाहन चालकांविरूध्द पोलिस विभागाच्यावतीने कार्यवाही करण्यात आली. त्यांचेकडून १८ हजार ५०० रूपयांचा दंड वसूल करण्यात आला. तसेच चार ठिकाणी अवैध दारू विक्रेत्यावर छापा टाकण्यात आला आहे.

# आडगाव ते ढऊळगाव रस्त्याचे आ. नवघरे यांचेहस्ते भूमीपूजन



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, ३ एप्रिल**

तालुक्यातील आडगाव रंजे नजीक असलेल्या ढउळगाव येथे मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेअंतर्गत आडगाव ते ढउळगाव रस्त्याचे भूमीपूजन आमदार चंद्रकांत उर्फ राजुभैया नवघरे यांच्या हस्ते झाले.

रामा-२४९ आडगाव ते ढउळगाव रस्त्याची सुधारणा करणे असून ऐकून लांबी ०/०० ते ७/७०० किमी अंदाजित रक्कम : १०६५.८५ लक्ष आहे. सदरील रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण होणार आहे. या रस्त्याचे भूमिपूजन राजुभैया नवघरे यांच्या हस्ते संपन्न झाले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पंढरी क्षिरसागर यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष काशिनाथ आण्णा क्षिरसागर, प्रमुख पाहुणे म्हणून बालूमामा ढोरे, वसमत कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती सचिन भोसले, संचालक बबलू चव्हाण, बालासाहेब चव्हाण माजी सरपंच,प्रताप चव्हाण, किरण देशमुख, संचालक विनोद अंभोरे, दत्तराव चव्हाण चेअरमन, बन्सीधर क्षिरसागर, बबलू कदम उपसरपंच, हनुमान चव्हाण, इंजिनिअर कुलकर्णी इत्यादी उपस्थित होते. सदरील कामाला प्रशासकीय मान्यता मिळाली असून कॉंक्रीटचे दोन थर करण्यात येणार असून या रस्त्यासाठी रूंदी ५० फूट लागणार असून हे काम चांगल्या दर्जाचे करण्याच्या सूचना आ.नवघरे यांनी यावेळी दिल्या. अभियंता कुलकर्णी यांनीही काम चांगल्या दर्जाचे करणार असल्याचे आश्वासन यावेळी दिले. यावेळी ग्रामस्थ उपस्थित होते.

# कंत्राटदाराची बिले देण्यासाठी सांबाकडे अपूरा निधी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाने कंत्राटदारांच्या देयकापोटी २७५ कोटी रूपयांची मागणी नोंदवली असतांना प्रत्यक्षात ४७ कोटी रूपयांचा निधी मिळाल्याने बांधकाम विभाग हतबल झाला असून अपूऱ्या निधीमुळे कंत्राटदारांमधूनही असंतोष निर्माण झाला आहे. आता या निधीचे वाटप कसे करावे असा प्रश्न उभा ठाकला आहे.

जिल्ह्यात सार्वजनिक बांधकाम विभागाकडून जिल्हा व इतर मार्ग, राज्य महामार्गाची कामे करण्यात आली आहेत. यामध्ये प्रामुख्याने डांबरीकरण, दुरूस्ती, मजबुतीकरणाच्या कामांचा समावेश आहे. दरवर्षी ही कामे पुर्ण झाल्यानंतर तसेच प्रगतीपथावर असलेल्या कामांची देयके कार्यालयात सादर केली जातात. त्यानंतर शासनाकडून निधी प्राप्त झाल्यानंतर कंत्राटदारांच्या देयकाला मंजूरी देऊन देयक अदा केले जाते. मार्च अखेर शासनाकडून मागणीनुसार निधी दिला जात असल्याने कार्यालयासह कंत्राटदारांचे शासनाच्या निधीकडे डोळे लागलेले असतात.

जिल्ह्यात जिल्हा व इतर मार्गाची १५४ कामे मंजूर होती त्यापैकी ६० कामे पूर्ण झाली असून ९४ कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांच्या देयकापोटी कार्यालयाने शासनाकडे १२५ कोटी रूपयांची मागणी नोंदवली होती. मात्र शासनाकडून प्रत्यक्षात ९ कोटी रूपयांचाच निधी देण्यात आला. राज्य महामार्गामध्ये मंजूर ५४ कामांपैकी १८ कामे पूर्ण झाली असून ३४ कामे प्रगतीपथावर आहेत. या कामांच्या देयकासाठी १४० कोटींच्या निधीची मागणी नोंदवली होती. मात्र प्रत्यक्षात २९ कौटी रूपयांचाच निधी मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय राज्य महामार्गावर ४० ठिकाणी खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून यासाठी ७ कोटींची मागणी नोंदवली होती. प्रत्यक्षात ४.४१ कोटी रूपयांचाच निधी मंजूर झाला आहे. जिल्हा व इतर मार्गावर ६० ठिकाणी खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण झाले असून या कामांच्या देयकासाठी ६ कोटींची मागणी नोंदवली होती मात्र प्रत्यक्षात ४.७०कौटी रूपयांचाच निधी मंजूर झाला आहे. मागणीच्या तुलनेत २३० कोटी रूपयांचा निधी कमी मिळाल्यामुळे आता कंत्राटदारांची देयके कशी अदा करावी असा प्रश्न सार्वजनिक बांधकाम विभागासमोर उभा ठाकला आहे.

# सत्संगाच्या माध्यमातून आपले मन शुध्द करू शकतो- माँ कनकेश्वरी देवी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

प्रभु श्री राम जर आपल्या चैतन्यात आले तर आपले वर्तमान जीवन अंतरात्मामध्ये चैतन्य अनुभवु शकतो. सत्संगाच्या माध्यमातुन आपले मन शुद्ध करु शकतो असे माँ कनकेश्वरी देवी यांनी सांगितले.

येथील मंगळवारा बाजार भागातील श्री दत्तमंदिरात श्री राम कथा ज्ञानयज्ञ सोहळा दि. ३० मार्च ते दि.७ एप्रिल दरम्यान महामंडलेश्वर श्री श्री १००८ प.पु.माँ. कनकेश्वरी देवीजी या मधुर वाणीतुन कथासुत्र सुरु आहे. या कथेच्या चौथ्या दिवशी माँ कनकेश्वरी देवीजी यांनी पुढे म्हणाल्या की, चैतचा अर्थ असा आहे की आपण सत्संगाच्या माध्यमातून आपले चैतन्य उन्नत करू शकतो. प्रभू श्री राम जर आपल्या चैतन्यात आले तर आपण वर्तमान जीवनात आपल्या अंतरात्म्यामध्ये चैतन्य अनुभवू शकतो. आपण दीर्घकालीन सत्संगामध्ये राहिल्यास आपले मन शुद्ध करण्याचे काम सत्संगाच्या माध्यमातुन केल्या जाते. संत्सग मध्ये वक्ता हा शास्त्रज्ञशुद्ध आणि तत्त्वज्ञानी असावा. वक्ता केवळ शास्त्रज्ञशुद्ध नाही तर तत्त्वज्ञानी असेल तर त्याचा उद्देश समाजाला लाभ होतो. भक्त तो असतो जो कोणत्याही परिस्थितीत भगवंताच्या कृपेवर शंका घेत नाही. भगवंतापासून दूर राहणेच तुम्हाला सांसारिक जीवनात अडकवते आणि भगवंताची उपस्थिती तुम्हाला जीवनात मुक्तीचा मार्ग अनुभव देते. सत्संग माणसाला चांगला सामाजिक कार्यकर्ता बनवतो. सत्संगाच्या माध्यमातून मन इतके शुद्ध केले पाहिजे की बुद्धी वादग्रस्त आणि मन तक्रारदार होऊ शकत नाही. सद्गुरू भगवंताला तोंड देऊन भक्ती प्रदान करतात. चांगल्या संगतीने माणसांच्या मनातील दोष दूर होतात. जो ज्ञानी व्यक्ती सामर्थ्यमुक्त असतो तो सेवेत यशस्वी होतो असे माँ कनकेश्वरी देवीजी यांनी सांगितले. यावेळी बुधवारी रामचंद्र कयाल यांनी सहपरिवार माँ कनकेश्वरी देवीजी यांचा सत्कार केला. दैनंदिन यजमान सुभाषचंद्र घनश्यामदास तापडिया हे होते. तर महाप्रसादचे यजमान प्रल्हाद रामभाऊ बासटवार हे होते. यावेळी संत्सग ऐकण्यासाठी आलेल्या हजारो भाविकांना महाप्रसाद वितरीत करण्यात आला.

# हळदीला प्रतिक्विंटत १० ते १४ हजार भाव




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, ३ एप्रिल**

येथील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संत नामदेव मार्केट यार्डमध्ये गुरूवारी १० ते १२ हजार क्विंटल हळद विक्रीसाठी आली होती. हळदीला प्रतिक्विंटल १० ते १४ हजार एवढा भाव मिळाला.

सकाळपासून मार्केट यार्डच्या बाहेर सुमारे २५० ते ३०० वाहनांची रांग लागली होती. मार्केट यार्डपासून ते अंबिका टॉकीजपर्यंत चौकापर्यत वाहनांची रांग दिसत होती. हळदीला सध्या चांगला भाव मिळत असल्याने मोठ्या प्रमाणात शेतकरी हळद विक्रीसाठी आणत आहेत.

# ग्रामीण पोलीसांचे कोंबिंग ऑपरेशन

## ३९ ठिकाणी छापे ; ६५ हत्यारे जप्त

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०३ एप्रिल**

ग्रामीण पोलीसांनी कोंबिंग ऑपरेशन राबवुन मोठी कारवाई केली आहे. या कारवाईत पोलीसांनी ३९ ठिकाणी छापे मारून १० ठिकाणी कारवाई तर या कारवाईत ६५ हत्यारे जप्त करण्यात आले तसेच खंजर बनवण्याच्या कारखाना उद्धवस्त करण्यात आला.

जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांच्या आदेशावरून शहरातील सर्वच पोलीस ठाण्यांनी कोंबिंग ऑपरेशन राबविले. यात ग्रामीण पोलीसांनी मोठी कारवाई केली. खंजर, कोयता, कुऱ्हाडी, तलवार आदी ६५ विविध हत्यारे जप्त करण्यात आली. या कारवाई दरम्यान आरोपीकडून ६ मोटारसायकली व १ चारचाकी वाहन जप्त करण्यात आले. ही वाहने चोरीची असल्याचा संशय असल्याने त्याचा तपास सुरू आहे. त्याच बरोबर अंधाराचा फायदा घेवून चोरी करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एकावर गुन्हा दाखल करण्यात आला. तर शस्त्र अधिनियमाप्रमाणे १० आरोपींवर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.



या कारवाई नंतर जिल्हा पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार यांनी ग्रामीण पोलीस ठाण्यात जावून कारवाईची माहिती घेतली. ही कारवाई पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर व त्यांच्या पथकाने केली.

# किनवट आगारात लवकरच १० लालपरी होणार दाखल : आ. केराम

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि.०३ एप्रिल**

खिळखिळ्या झालेल्या एसटी महामंडळाच्या बसेस मधून प्रवास करताना प्रवाशांना वैताग आला असतानाच राज्य शासनाच्या धोरणानुसार प्रत्येक बस आगाराला नवीन एस टी गाड्या देण्याची घोषणा प्रत्यक्षात अमलात आणत असतानाच आमदार भीमराव केराम यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि परिवहन मंत्री त्यांच्याकडे सतत पाठपुरवठा केल्याने गुढीपाडव्याच्या दिवशीच किनवट आगाराला येत्या आठ दिवसात नवीन १० बसेस मिळणार तर माहूर आगारात पाच बसगाड्या दाखल झाल्याची माहिती आ.भिमराव केराम यांनी दिली.



प्रवाशांची पहिली पसंती एस टी बसच आहे त्यातच राज्य परिवहन महामंडळाने लाडक्या बहिणींना पन्नास टक्के ६५ वर्षावरील जेष्ठ नागरिकांना ५०% तर ७५ वर्षापेक्षा जास्त असलेल्या नागरिकांना शंभर टक्के सवलती दिले आहेत तर शालेय मुलींना विनामूल्य प्रवास तर विद्यार्थ्यांनाही प्रवास भाड्यात सवलती दिल्या आहेत त्यात खेळाडूंना आजारी व्यक्तींनाही रुग्णालयात जाण्यासाठी प्रवासी भाड्या सूट दिली आहे त्यामुळे सध्या लग्नसराई आणि सुट्याचा मोसम सुरू झाल्याने प्रवाशांची एसटी बसेस मध्ये मोठी गर्दी दिसून येत आहे त्यातच एसटी कर्मचारी कमी आहेत आहे त्यातच बसेस कालबाह्य झालेले आहेत जुन्या खिळखिळ्या बसेसने प्रवास करताना प्रवाशांना आनंत अडचणी येत असल्याने राज्यशास्त्राने प्रत्येक बस आगाराला नवीन लाल परी बसेस देण्याची घोषणा केल्याप्रमाणे या नवीन बसेसचे वितरण सुरू असतानाचा श्रीक्षेत्र माहूर येथे आगारात गुढीपाडव्याच्या दिवशीच पाच नवीन बसेस दाखल झाले आहेत आमदार भीमराव केराम यांच्या हस्ते पूजा करून माहूर बस स्थानक ते दत्तशिखर असा प्रवास आमदार भीमराव केराम यांनी प्रवाशा समवेत केला श्री रेणुका देवी दत्तशिखर आणि शिखर संस्थांचे महत्त्व महाराज आदरणीय मधुसूदन भारती यांचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले.

किनवट येथे पत्रकारांशी बोलतांना आ..केराम म्हणाले आता लवकरच किनवट आगारात दहा नवीन एसटी बसेस दाखल होणार आहे यातील एक बस किनवट ते पुणे सोडण्यासाठी आमचा प्रयत्न राहील त्यात काही लांब पडण्याच्या बसेस सोडण्यात येणार असल्याचे आमदार केल्याने सांगितले किनवट आगारात कर्मचारी कमी असल्यामुळे प्रवाशांना होणारा त्रास दूर करण्यासाठी किनवट आगारातील सर्वच बसेस आपल्या निर्धारित वेळेत सोडण्यासाठी किनवट आगार प्रमुखांना सूचना दिल्याचेही त्यांनी सांगितले एकूणच नवीन बसेस आगारात दाखल झाल्या तर प्रवाशांची मोठी गैरसोय दूर होणार असून प्रवाशांना आरामदायी प्रवास एसटी बसणे करता येईल असेही ते यावेळी बोलताना म्हणाले यावेळी माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार जिल्हा उपाध्यक्ष श्रीनिवास श्रीमान भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष संदीप केंद्रे स्वागत आयनेणीवार भाजपाचे ज्येष्ठ नेते अनिल तिरमलवार आदींची उपस्थिती होती.

## संक्षिप्त वृत्त



### चाणक्य इंग्लिश स्कूलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा

**मुखेड**-येथील चाणक्य इंग्लिश स्कूलचा वार्षिक स्नहेसंमेलन सोहळा मोठ्या उत्साहात् संपन्न झाला आहे. शाळेतील चिमुकल्यानी विविध देखाव्यासह आपल्या केलेचे सादरी करण करुण उपस्थितांना मंत्रमुग्ध केले आहे। शाळेतिल विद्यार्थ्यानि समाज उपयोगी सादरीकरण केल्यामुळे जनजागृति संदेश दिला आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष एस. पी. देशमुख साहेब जिल्हा व सत्र न्यायाधीश मुखड़े प्रमुख अतिथी :- के. एम. मुंढे साहेब (प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी मुखेड), डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य महाराज गणाचार्य मठाधीश, जी. टी. जाधव साहेब अध्यक्ष अभिवक्ता संघ मुखेड, श्री गोविंद केंद्रे सर सचिव सचिव परफेक्ट इंग्लिश स्कूल पेठवडज, डॉ. खंडागळे मॅडम स्त्रीरोग तज्ञ अविरत मॅटरनिटी हॉस्पिटल मुखेड आदीमान्यवर या कार्यक्रमास उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऍडव्होकेट जोगदंड साहेब व गौरवी गजानन हिवराळे यानी. केले तर आभार प्रदर्शन सौ शिवपूजे मॅडम चाणक्य इंग्लिश स्कूलच्या संचालिका सौ. अनुराधा हिवराले मॅडम व एडवोकेट गजानन हिवराळे यानी उपस्थित मान्यवरांचा सत्कार करून कार्यक्रम आयोजनाची भूमिका विषयक केली या कार्यक्रमात शाळेतील चिमुकल्याने विविध गीतावर नृत्य करुण उपस्थित आमचे मने जिंकली। शाळेतील विद्यार्थी गणेश जुन्रे, पार्थ वडजे, स्वराज वडजे, श्लोक मंडले, गिरगावकर आविष्कारक, रुद्रा घाटे, अफानशेख, बाबळे विराट, नलावाड सिद्धेश्वर, आराग कांबळे, सोनाली राठौड़, अविष्कार राठौड़, स्वरा साखरे, सिद्धि कमलवाड, स्वाति साखरे, शादुल चौहान, साइचरण शिंदे, सुधाकर इंगळे, स्वराजली गायकवाड, अकुलवाढ वैष्णवी, ओंकार जाधव, शिंदे श्रुति, कृष्णा शिंदे, मंडले समृद्धि, वाडीकर कार्तिक, अक्कमवाड यश, हिवराळे गौरंग, मंडेवाड साई, बड़ेवाड रुद्र, वल्लेपवाड श्रीनिवास, भारत जाधव, जाधव सार्थक, पाटील आदिराज साहेबराव, चव्हाण खुशी, चव्हाण कार्तिक, देवांश इंगोले, बोइनवाड वैष्णवी, वाकोडे विराज, तमालवाड विनायक, सांगवी सोनकांबळे, महेश्वरी शिंदे, ईश्वरी शिंदे, जुन्रे सांची, चव्हाण क्रांति, जांगदे माही, राउखेडे ऐश्वर्या, चोंडे सोनाली, प्रतीक पयारे, सानवी दिनकर, सर्वज्ञ कदम, अलीशा पठान, माधव मामीलवाड, अनन्या कागने, रिजवान शेख, अंवतिका गिरगावकर, वेदिकाल्ला बिळे या शैलेतिल विविध विद्यार्थ्याची आपल्या कलागुनाचे सादरीकरण करुण उपस्थितांचे मने जिंकली आहेत. इंग्लिश स्कूलच्या शिक्षिका शिवपूजे मैडम, शिंदे मॅडम सचिन जुने, शेळके मैडम, रानी मेदवाड, दिनकर मैडम, सलमा शेख, इतर कर्मचाऱ्यांनी वार्षिक स्नेहसंमेलन यशश्वीतेसाथी पुधाकर घेतला आहे। कार्यक्रम शहर में आयोजित नागारिक शालेय विद्यार्थ्याचे पालक विद्यार्थी मोठ्या संख्येन उपस्थित होते हैं। राष्ट्रगीताने कार्यक्रम सांगता करण्यात आली.



**हाणेगाव-सामाजिक वनीकरण विभाग व महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने २ कोटी वृक्ष लागवडीचा संकल्प हाती घेऊन जून जुलैमध्ये शालेय परिसरासह ठिकठिकाणी वृक्ष लागवड केली आहे. हे वृक्ष जगवण्याकरिता देगलूर तालुक्यातील प्रगती माध्यमिक विद्यालयाचे विद्यार्थी वृक्ष जगवण्याचा संकल्प हाती घेऊन पाणी टाकत आहेत.**

# आ. चिखलीकर यांच्या उपस्थितीत शिराढोण येथे उद्या एक दिवस गावकऱ्यांसोबत अभियान

**तभा वृतसेवा**
**कंधार, दि.०३ एप्रिल**

जनतेच्या विविध समस्या आणि अडीअडचणी जाणून घेऊन त्या गावातच सोडवण्याचे अनुषंगाने शासन आपल्या दारी या धरतीवर एक दिवस गावकऱ्यांसोबत हा अभिनव उपक्रम राबविण्यात येत असून दि. ५ एप्रिल रोजी कंधार तालुक्यातील शिराढोण येथे या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीत या अभिनव उपक्रमात जनतेच्या अडीअडचणी आणि समस्या सोडविण्यात येणार आहेत.



शासनाच्या सर्व योजना पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. प्रत्येक पात्र लाभार्थ्याला शासनाच्या योजनांचा लाभ मिळाला पाहिजे. जनतेचे असलेले अडीअडचणी गावातच सोडविता आले पाहिजेत. या अनुषंगाने शासन आपल्या दारीच्या पार्श्वभूमीवर एक दिवस गावकऱ्यांसोबत हा अभिनव उपक्रम राबविण्यात येणार आहे. या अभिनव उपक्रमात जनतेचा वेळ वाचवण्यासाठी आणि त्यांचा पैसा वाचवण्याचे अनुषंगाने शासनाच्या विविध विभागाचे अधिकारी गावात येऊन ग्रामस्थांशी चर्चा करतील. या चर्चेमध्ये विविध प्रश्नांची सोडवणूक ही केली जाईल. दि. ५ एप्रिल रोजी दुपारी १ वाजता शिराढोण येथे पार पडणाऱ्या या उपक्रमात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

यावेळी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार ,पोलीस निरीक्षक , कृषी अधिकारी, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी व अन्य संबंधित विभागाचे सर्व खाते प्रमुख उपस्थित राहतील अशी माहिती देण्यात आली असून जनतेने अडीअडचणी व तक्रार निवारणासाठी एक दिवस गावकऱ्यांसोबत या उपक्रमास उपस्थित राहावे असे आवाहन गटविकास अधिकारी महेश पाटील यांनी केले आहे.

# भोकर शहरात रेतीची अवैध वाहतूक

**तभा वृतसेवा**
**भोकर, दि.०३ एप्रिल**

शहरात मोठ्या प्रमाणात रेतीची अवैध वाहतूक होत असताना महसूल विभागाने याकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करित आहे.

भोकर शहरात मागील काही दिवसापासून रेती मूरुम अवैधरित्या उत्खनन सूरु आहे. याकडे भोकर महसूल विभाग साफ दूर्लक्ष करित आहे. महसूल विभागाचे पथक नावालाच असून पथकातले कर्मचारी नांदेडहून ये-जा करीत असल्याची माहिती आहे. रात्री बे रात्री रेतीची वाहतूक होत असताना पथक मात्र गाढ झोपेत असते रेतीमाफीयांनी महसूल विभागाला हाताशी धरुन आपला व्यवसाय सूरु ठेवल्याची खात्रीलायक माहिती मिळाली आहे. या माफीयांना कोणीही अडवू शकत नाही कारण महसूल विभागातील काही कर्मचारी तसेच तलाठी मंडळ अधिकारी यांचेसोबत रेती माफीयांचे अर्थिक हितसंबध असल्याने अर्थिक तडजोड करुन हा प्रकार सर्रास चालू आहे. यामूळे शासनाचा लाखोंचा महसूल बूडत आहे. महसूल विभागाच्या जबाबदार अधिकाऱ्यांकडून रेती अवैध वाहतूकीला हिरवा कंदिल मिळत असल्याने रेतीमाफीयांचे मनोबल वाढले आहे. कधी दिवसा तर कधी रात्रीला सर्रास रेतीची वाहतूक होताना अढळून येते. भोकरच्या महसूल विभागाने सर्व सामान्यांची कामे प्रलंबित ठेवत जो दाम देईल त्याचे काम होईल असाच प्रकार पहावयास मिळत आहे. वरिष्ठांनी भोकर शहरात सूरु असलेल्या रेतीच्या अवैध वाहतूकीकडे लक्ष घालून रेती माफीयांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे.

# 'जगद्गुरु नरेंद्रचार्य नानिज्धाम' संस्थानची रुग्णवाहिका रुग्णांसाठी 'जीवनदायिनी'

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.०३ एप्रिल**

अपघातग्रस्तांसाठी जीवनदायिनी म्हणून नावारूपास येत असलेली 'जगद्गुरु नरेंद्रचार्य नानिज्धाम' संस्थानची रुग्णवाहिका वर्षभरात हजारो रुग्णांसाठी 'जीवनदायिनी' ठरली आहे. जुलै २०२३ ते मार्च २०२५ या दिड वर्षाच्या कालावधीत अनेक रुग्णांना रुग्णवाहिकेतून वेळेत उपचार देण्यात यश आले आहे.

रस्ते अपघातात वेळेवर मदत मिळत नसल्याने अनेकांना आपले प्राण गमवावे लागले. अपघातग्रस्त रुग्णांना तातडीने उपचार मिळावेत हॉस्पिट पर्यंत पोहोचविण्यासाठी ' जगतगुरू नरेंद्राचार्य महाराज यांच्या संस्थानची रुग्णवाहिक ही संकल्पना पुढे आणली. यातून रस्ते अपघातात अनेक अपघातग्रस्तांना मोठी व जलद गतीने मदत मिळत आहे. महाराष्ट्रात एकूण ५३ रूग्णवाहीका सेवा देत असुन आजपर्यंत २७ हजार २७० अपघातग्रस्तांचे प्राण वाचले आहेत. या मदतीचे स्थानिक पातळीवरूनही कौतुक केले जात आहे. महामार्गावर अपघातग्रस्तांच्या मदतीसाठी कोणीही पुढे येत नाही व वेळेवर मदत न मिळाल्याने अनेकजणांचा रस्त्यावरच प्राण जातो. अपघातग्रस्तांची गैरसोय होऊ नये, त्यांना वेळेत उपचार मिळावा या हेतूने जगतगुरू नरेंद्राचार्य महाराज यांनी हा उपक्रम हाती घेतला आहे.

# अर्धापूर तालुक्यातील २१ हजार लाभार्थ्यांना घरपोच वितरीत होणार ई-शिधापत्रिका

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि.०३ एप्रिल**

मुख्यमंत्री यांच्या १०० दिवसाच्या कृती कार्यक्रम अंतर्गत तालुक्यातील एकूण २१ हजार ६३० पात्र शिधापत्रिका धारकांना ई-शिधापत्रिकेचे घरपोच वितरण करण्यात येणार आहे. तहसीलदार रेणुकादास देवणीकर यांनी नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी विविध उपक्रम राबविले असून त्यांच्या कामाचे कौतुक होत आहे.

तालुक्यातील अनेक गावातील पांदण रस्त्यांचा प्रश्न मार्गी काढला, शेतकरी ओळखपत्र मोहीम यशस्वी रित्या राबविली व तहसील परिसरात आलेल्या नागरिकांना पिण्याच्या पाण्याची, स्वच्छता गृहाची व्यवस्था केली आहे. मुख्यमंत्री यांचा १०० दिवसाच्या कृती कार्यक्रम अंतर्गत तहसिल कार्यालय अर्धापुर यांच्या वतीने तालुक्यातील पात्र शिधापत्रिका धारकांना ई-शिधापत्रिकेचे घरपोच वितरण करण्याचा नाविण्यपूर्ण उपक्रम हाती घेण्यात येणार आहे. या उपक्रमा अंतर्गत दि. १ एप्रिल ते १५ एप्रिल या कालावधीत पहिल्या टप्प्यात सर्व ' 'अंत्योदय' लाभार्थी यांना घरपोच ई-शिधापत्रिका वितरीत करण्यात येणार असुन नंतर अन्नसुरक्षा योजना, ए.पी.एल. शेतकरी व इतर उर्वरीत शिधापत्रिका धारकांना ई-शिधापत्रिकांचे घरपोच वितरण करण्यात येणार आहे. त्याच बरोबर जीवंत ७/१२ मोहिम राबविण्यात येत आहे.

तालुक्यात एकूण २१६३० शिधापत्रिका असुन यामध्ये अंत्योदय योजनेतील १२८९ शिधापत्रिका आहेत. तसेच प्राधान्य गट योजनेतील १४३१८ शिधापत्रिका आहेत. तसेच उर्वरीत ३४४१ एपीएल शिधापत्रिका असून एनपीएच गटातील २५८२ शिधापत्रिका आहेत. गावनिहाय ई-शिधापत्रिका वितरणाचा कार्यक्रम आखला असुन त्यात कमी लाभार्थी संख्या असलेला गावांची निवड करुन सरपंच पोलीस पाटील, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, ग्राम महसुल अधिकारी तसेच नायब तहसिलदार यांच्या उपस्थीत ई-शिधापत्रिकांचे वितरण करण्यात येणर आहे.

यामुळे विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना विविध कामासाठी व योजनासाठी शिधापत्रिकांची आवश्यकता असते. त्यांचा वेळ, श्रम व पैसा याची बचत व्हावी या साठी तहसिलदार रेणुकादास देवणीकर उपक्रम हाती घेतला आहे. यासाठी तहसिलदार रेणुकादास देवणीकर, पुरवठा निरीक्षण दिनेश खंदारे, अ.का.रामेश्वर सावते, महसुल सहायक विनोद भांगे हे परिश्रम घेत ओहत.

# चोंडी येथे आज हजरत मोतीबाशा संदल ऊर्स शरीफ

**तभा वृतसेवा**
**मुखेड , दि.०३ एप्रिल**

मुखेड तालुक्यातील चोंडी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी हजरत मोतीबाशा संदल ऊर्स साजरा करण्यात येणार आहे.

हणमंत इरन्ना पांचाळ यांच्या निवास्थान येथून श्री गुरु महाराज खमर अलिशा खादरी शिरगांपूरकर( तेलंगाना )यांच्या नेतृत्वखाली संदल काढण्यासाठी सुरवात होईल त्यांच्या सोबत बाबा खादरी सुलेमान फारम महाराज संत सुफी उपस्थित राहतील. गावातील हिंदू मुस्लिम सर्व समाज बांधव भाविक भक्त एकत्र येत संदल मिरवणूक गावातील मुख्य रस्त्याने काढण्यात येते. गावातील बाहेरून आलेल्या भाविक मोठ्या प्रमाणात संदल ऊर्स शरीफ मध्ये शामिल होत असतात. गावातील हिंदू - मुस्लिम बौद्ध सर्व समाज बांधव जागो जागी मिरवणुकीचे जंगी स्वागत केले जाते. संदल मिरवणूक गावातील मुख्य रस्त्यावरून वाजत गाजत हजरत मोतीबाशा दर्गाह येथे पोहचल्या नंतर संदल चढवल्या जातात. संद्दल कार्यक्रम समाप्ती नंतर भाविकांना महाप्रसाद होणार आहे तर दुसऱ्या दिवशी ही महाप्रसाद पंच कमिटी व चोंडी गावाकऱ्याच्या वतीने आयोजन करण्यात आले आहे. सर्व समाज बांधवानी हजरत मोतीबाशा संदल शरीफ मध्ये सहभागी होवून कार्यक्रमाची शोभा वाढवावी तसेच कवालीचा जंगी मुकाबला लुकमान ताज अकोला विरुद्ध रोशनी वारसी यांच्यात होणार आहे तरी या कार्यक्रमाचा जास्तीत जास्त समाज बांधवांनी उपस्थित राहुण कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन हजरत मोतीबाशा पंच कमेटीचे युवा नेतृत्व शेख मुजाहीद चोंडीकर यांनी केले आहे.



**मुखेड- येथील माजी नगराध्यक्ष अनिल जाजू यांच्या मळ्यात गुळ निर्मिती मोठ्या प्रमाणात होत आहे. गुळाची निर्मिती होत असल्यामुळे या भागात बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात गुळ विक्री होत आहे.**

# मुदखेड तालुक्यातील ४३ ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि.०३ एप्रिल**

ग्रामपंचायत निवडणूक लढवून त्या निवडणुकीत विजय मिळविला पण निवडून आल्यानंतर एक वर्षाचा कालावधी उलटून गेल्यानंतरही जात वैधता प्रमाणपत्र सादर केला नाही त्यामुळे जिल्ह्यातील १३६५ ग्रामपंचायत सदस्यांना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिला दणका यामध्ये मुदखेड तालुक्यातील ४३ ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्याचे आदेश जिल्हाधिकारी कार्यालयातुन तहसील कार्यालयात पाठवण्यात आले

सविस्तर माहिती अशी की सार्वत्रिक ग्रामपंचायत निवडणुकीसाठी दि. १५ जानेवारी २०२१ रोजी मतदान झाले व दि.१८ जानेवारी रोजी निकाल लागला व दिनांक १० जुलै २०२३ पर्यंत इतर काही ग्रामपंचायतीच्या पार पडल्या होत्या.

दि.१ जानेवारी २०२१ ते १० जुलै २०२३ या कालावधीत पार पडलेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक तसेच पोटनिवडणुकीत राखीव जागेवर निवडून आलेल्या सरपंच उपसरपंच आणि सदस्यांना मुदतीत जात वैधता पडताळणी प्रमाणपत्र सादर करायचे होते परंतु प्रमाणपत्र सादर न केल्यामुळे अपात्र करण्यासाठी या अगोदर सुनावण्या झाल्या होत्या.

या ग्रामपंचायत निवडणुकीत राखीव जागेवर निवडून आलेल्या सदस्यांनी जात वैधता आणि प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य होते परंतु बऱ्याच सदस्यांनी तसेच केले नाही त्यामुळे ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले यामध्ये मुदखेड तालुक्यातील ४३ ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले.

यात पिंपळगाव येथील उपसरपंच कोल्हा येथील उपसरपंच आणि एक वाई येथील सरपंच थेट यासह चिकाळा तांडा १, चिलपिपरी १, दरेगाव वाडी १, देवापूर २, डोंगरगाव १, गोपळवाडी १, हजापूर २, कमळज २, कोल्हा ३, महाठी १, माळकौठा ४, मेंडका १, निवघा १, पार्डी वैजापूर १, पिंपळकोठा चोर १, पिंपळकोठा मगरे १, राजवाडी २, रोहिपिंपळगाव ४, रोहिपिंपळगाव तांडा १, सरेगाव १, शेंबोली १, टाकळी १, वैजापूर पार्डी २, वाडी मुक्तारपूर १, वाडी नियमतुलापुर १,आणि वाई येथील (५) असे एकूण ४३ जणांचे ग्रामपंचायत सदस्यांचे सदस्यत्व रद्द करण्यात आले.

# आंतरराष्ट्रीय पॅराथेलेटिक्स व खेलो इंडिया स्पर्धेत भाग्यश्री जाधव ठरली चार सुवर्ण पदकांची मानकरी

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि.०३ एप्रिल**

दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या आंतरराष्ट्रीय पॅराथेलिटिक्स चॅम्पियनशिप व खेलो इंडिया या दोन स्पर्धेत नांदेडची भूमिपुत्र व शिवछत्रपती पुरस्कार विजेती भाग्यश्री जाधव हिने गोळाफेक व भालाफेक या दोन्ही क्रीडा प्रकारात चार सुवर्णपदके पटकावली आहेत.

नांदेड जिल्ह्यातील मुखेड तालुक्यातील होनवडज येथील रहिवाशी असलेली आंतरराष्ट्रीय दिव्यांग खेळाडू भाग्यश्री जाधव हिने दिव्यांग राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत स्वतःचे आगळे वेगळेस्थान निर्माण केले आहे. सन २०१९ पासून आजपर्यंत झालेल्या वेगवेगळ्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील क्रीडा स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून निवड झालेली एकमेव महिला खेळाडू ठरली आहे. भागश्री जाधव हिने महाराष्ट्राबरोबरच देशाचे नेतृत्व केले आहे.



भाग्यश्री हिच्या क्रीडा प्रवासाची सुरुवात २०१७ साली पुणे येथे झालेल्या महापौर क्रीडा स्पर्धेपासून झाली. पहिल्याच स्पर्धेत तिने दोन सुवर्ण पदकांची कमाई केली. सन २०१८ मध्ये पंचकुला, सन २०१९ मध्ये चीन, सन २०२० मध्ये बंगळूरू, सन २०२१ मध्ये दुबई येथे, पोर्तुगाल, मोरक्को येथे , सन २०२३ मध्ये चीन येथील आशियाई क्रीडा स्पर्धा त्याच बरोबर खेलो इंडिया आदी ठिकाणी झालेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदकांची लयलूट केली आहे. जपान येथे मे-२०२४ मध्ये झालेल्या पॅरा वर्ल्ड चॅम्पियनशिप स्पर्धेत तिने रौप्य पदक पटकावले आहे. २०२१ मध्ये टोकिओ व २०२४ मध्ये पॅरिस येथे झालेल्या पॅरा ऑलिंम्पिक स्पर्धेत सहभागी होण्याचे सौभाग्य तिला लाभले आहे. विशेष म्हणजे गतवर्षी पॅरिसमध्ये झालेल्या पॅरा ऑलिंम्पिक स्पर्धेत भारतीय संघाचा ध्वजवाहक होण्याचा बहुमान भाग्यश्री जाधव हिला मिळाला आहे. महाराष्ट्र शासनाने तिचा शिवछत्रपती पुरस्कार देऊन गौरव केला आहे.

नवी दिल्ली येथे नुकत्याच पडलेल्या आंतरराष्ट्रीय पॅरा थेलिटिक्स चॅम्पिअनशीप तसेच खेलो इंडिया या स्पर्धेत भाग्यश्री जाधव हिने आपली चमकदार कामगिरी दाखवत गोळाफेक आणि भालाफेक या दोन्ही क्रीडा प्रकारात चार सुवर्ण पदकांवर आपले नाव कोरले आहे. या अतुलनीय कामगिरी बद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. विशेष म्हणजे ती बालेवाडी, पुणे येथे मुख्य क्रीडा कार्यकारी अधिकारी वर्ग- एक या पदावर दि.२ एप्रिल रोजी रुजू झाली आहे.

माझे मार्गदर्शक तथा गुरुबंधु ज्येष्ठ पत्रकार प्रकाश कांबळे, माझा परिवार,मुख्य क्रीडा प्रशिक्षक सी. सत्यनारायण (बंगळरू), सहाय्यक प्रशिक्षक सौ. पुष्पा मॅडम, दैनंदिन प्रशिक्षक रविंदर सर, मयूर रसाळ, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सुमठाणकर तसेच माझ्यावर उपकार करणारी सर्व डॉक्टर मंडळी,तसेच प्रसार माध्यमातील सर्व मान्यवर यांचा या यशात सिंहाचा वाटा आहे, अशी प्रतिक्रिया भाग्यश्री जाधव हिने व्यक्त केली.

# धारूर घाट: मृत्यूचा सापळा, आमदार-खासदारांची बेपर्वाई!



## अपघातांची मालिका सुरूच, जनतेचा आक्रोश!

**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.३ एप्रिल**

धारूर घाटात आज सकाळी पंढरपूरकडून सोनपेठकडे जाणारा एक आयशर टेम्पो ब्रेक फेल झाल्याने अपघातग्रस्त झाला. सुदैवाने चालक बापू रंगपिशे यांना कोणतीही दुखापत झाली नाही. मात्र, या घटनेने धारूर घाटातील धोकादायक रस्त्यांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून धारूर घाटात अपघातांची मालिका सुरू आहे. खामगाव ते पंढरपूर या मार्गावरील १३ किलोमीटरचा रस्ता आजही धोकादायक अवस्थेत आहे. या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अनेक सामाजिक संस्था, संघटना आणि राजकीय पक्षांनी वारंवार मागणी केली, मात्र विद्यमान आमदार आणि खासदारांनी याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले आहे.

जनतेचा आक्रोश:

✻ आमदार आणि खासदार केवळ निवडणुकीपुरतेच येतात, जनतेच्या समस्यांकडे लक्ष द्यायला त्यांना वेळ नाही, असा आरोप नागरिकांनी केला आहे.

✻ या रस्त्यामुळे अनेक निष्पाप लोकांचे जीव जात आहेत, याला जबाबदार कोण? असा संतप्त सवाल नागरिकांनी उपस्थित केला आहे.

✻ दिंडीत पंढरपूरला जाणाऱ्या वारकऱ्यांच्या जीवाशी खेळू नका, अशी मागणी वारकरी संप्रदायाने केली आहे.

मागण्या:

✻ तातडीने धारूर घाटातील रस्त्याची दुरुस्ती करावी.

✻ रस्त्यावर आवश्यक असलेले सुरक्षा उपाय योजना करावी.

✻ आमदार, खासदार आणि पालकमंत्र्यांनी या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे.

✻ राज्य आणि केंद्र सरकारने या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा.

या अपघातामुळे धारूर शहरातील आणि तालुक्यातील नागरिकांमध्ये प्रचंड संताप आहे. आमदार आणि खासदारांनी या प्रश्नाकडे तातडीने लक्ष न दिल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशारा नागरिकांनी दिला आहे.

---

### स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेचा मजबूत वार्षिक ताळेबंद

## १२३ कोटी ९५ लाख अर्थिक उलाढाल तर ७८ लाख ६६ हजार निव्वळ नफा : बाजीराव धर्माधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ एप्रिल**

शहरातील बँकींग क्षेत्रात ग्राहक सेवेत तत्पर व बँकीग व्यवहारात विश्वासार्ह पतसंस्था म्हणुन असलेली ओळख कायम ठेवत पतसंस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे.स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेची वार्षिक वाटचाल मजबूत व प्रगतीपथावर आहे. सरत्या अर्थिक वर्षात संस्थेने १२३ कोटी ९५ लाख अर्थिक उलाढाल तर ७८ लाख ६६ हजार निव्वळ नफा कमावला आहे.ग्राहक व ठेवीदारांच्या विश्वासावरच ही वाटचाल सुरु असल्याचे चेअरमन बाजीराव धर्माधिकारी यांनी सांगितले.



स्वा.वि.दा.सावरकर नागरी सहकारी पतसंस्थेची ३१ मार्च २२०२५अखेरचा ताळेबंद सादर करण्यात आला आहे. संस्थेची अर्थिकस्थिती पाहता संस्थेने उत्कृष्ट ताळेबंद निर्माण केला आहे. विशेश म्हणजे अल्पावधीतच पतसंस्थेतील ठेवी-ठेवी ४१ कोटी ०५ लाख , राखीव निधी - ७ कोटी ४७लाख,भागभांडवल- ६७ लाख ४२ हजार , खेळते भांडवल-५० कोटी १५ लाख, कर्ज- ३६ कोटी ०६ लाख ,गुंतवणूक १२ कोटी ५१ लाख, निव्वळ नफा ७८ लाख ६६ हजार इतका आहे.तर संस्थेची अर्थिक उलाढाल- १२३ कोटी ९५ लाख आहे.सीडी रेशो ६८.६२% इतका आहे.

पतसंस्थेच्या या प्रगतीशील वाटचालीत सर्व खातेदार, ठेवीदार,कर्जदार, हितचिंतक यांचा विश्वास हेच पाठबळ आहे असे अध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांनी सांगितले. पतसंस्थेचे उपाध्यक्ष अनिल आष्टेकर,सचिव जितेंद्र नव्हाडे , कोषाध्यक्ष रवि वळसे, संचालक श्रीकांत मांडे,राजाभाऊ मराठे, रवि मुळे, दशरथ होळकर, डॉ.सौ.श्रध्दा देशपांडे, सौ.पद्मश्री धर्माधिकारी यांच्यासह संस्थेचे व्यवस्थापक किरण सावजी यांच्यासह सर्व कर्मचारी वृंद, नित्यसंचय ठेव प्रतिनीधी यांच्या मेहनतीत व सर्व सभासद ,ठेवीदार, कर्जदार, खातेदार व हितचिंतकांच्या पाठबळावर संस्थेची ही वाटचाल सुरु आहे.

---

## श्रीगुरुचरित्र सारामृत पारायण व श्रीगुरुचरित्र कथामृत सोहळ्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ एप्रिल**

परळी वैजनाथ जवळील डोंगरतुकाई हे जाज्वल्य ठिकाण आहे.या मंदिरात गुहेत साधारणत: चार ते पाच पायऱ्या उतरून गेल्यावर खाली तळघर लागते. तळघर साधारणत: पाच फूट लांबी रुंदीचे आहे. याच गुहेत श्री.दत्तात्रय अवतार प.पू.श्री. श्रीमन नृसिंह सरस्वती स्वामी महाराज (गाणगापूर) हे याच गुहेत एक वर्ष वास्तव्यास राहिले होते. या अनुषंगानेच श्री वैद्यनाथ देवस्थान ट्रस्ट परळी वैजनाथ व गुरुतत्व प्रदीप यांच्या संयुक्त विद्यमाने श्रीगुरुचरित्र सारामृत पारायण व श्रीगुरुचरित्र कथामृत सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

भारतातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणुन मान्यता असलेल्या श्री वैद्यनाथ प्रभूच्या वास्तव्याने पवित्र पावन अशा परळी वैजनाथ या क्षेत्री श्रीमद् नरसिंह सरस्वती स्वामी महाराजांचे काही काळ वास्तव्य झाले, अशा पवित्र नगरीमध्ये श्रीगुरुचरित्र सारामृत पारायण व श्रीगुरुचरित्र कथामृत सोहळा सोमवार दि.०७-०४-२०२५ ते गुरुवार दि.१०-०४-२०२५ आयोजित करण्यात आला आहे. ९० वर्षापूर्वी संत कवी परमपूज्य दासगणू महाराजांनी श्री गुरुचरित्र या सिद्धग्रंथावर आधारित श्री गुरुचरित्र सारामृत हा सिद्धग्रंथ लिहला आहे. सांप्रत काळाचा विचार करून या धकाधकीच्या काळात श्रीगुरुचरित्राची नितांत गरज असल्याकारणाने सर्व कडक नियमांना शिथिलता देऊन सर्व समाजातील स्त्री- पुरुषांना वाचता येण्याकरता या ग्रंथाची निर्मिती करून घेतली.

गुरुतत्त्व प्रदीप या संस्थेने घरोघरी श्री गुरुचरित्र पोहोचावे या उदात्त हेतूने मागील एक वर्षाच्या कालखंडात १०८ व १००८ पारायणांचे सामुदायिक कार्यक्रम घेतलेले आहेत.या अनुषंगानेच परळी शहरात श्री वैजनाथ ट्रस्ट व गुरुतत्त्व प्रदीप यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या सोहळ्यात शहर व परिसरातील भाविकांनी जास्तीत जास्त संख्येने पारायणास बसावे. या कार्यक्रमात पारायण सेवा निशूल्क असुन पारायणास बसणाऱ्या वाचकांस पारायण समाप्तीनंतर आयोजकां तर्फे ग्रंथ प्रसाद रुपात देण्यात येईल. या सोहळ्यात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन श्री वैजनाथ ट्रस्ट व गुरुतत्त्व प्रदीप यांच्या वतीने करण्यात आले आहे.

अशी आहे कार्यक्रमाची रुपरेषा...

दर्शन मंडप, वैद्यनाथ मंदिर, श्री क्षेत्र परळी वैजनाथ येथे सोमवार दि.०७-०४-२०२५ ते गुरुवार दि.१०-०४-२०२५ होणाऱ्या या सोहळ्यात दैनंदिन सकाळी ८ ते ९ वा. : रुद्र अभिषेक, सकाळी ९ ते १२ वा. : श्री गुरुचरित्र सारामृत पारायण,दु. १२ ते २ वा. : भिक्षा, नैवेद्य, आरती व प्रसाद, दु.४:३० ते सायं. ७:३० वा. : श्री गुरुचरित्र कथामृत अशी रुपरेषा आहे.प.पू. मकरंद महाराज (पिठाधिपती, श्री क्षेत्र दत्तधाम (कारेगाव), परभणी) हे कथामृत विवेचन करणार आहेत.

---





बीड उन्हाळ्याची चाहूल लागताच बीडच्या भाजी मंडई मध्ये खरबूज आणि टरबुजाची आवक मोठ्या प्रमाणावर विक्रीसाठी आली आहे ( छाया कृष्णा शिंदे)

---

## अंबेवेस रस्त्यावरील फुटलेल्या धोकादायक ढाप्याची त्वरित दुरुस्ती करावी-अश्विन मोगरकर



**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.३ एप्रिल**

प्रभाग क्रमांक ५ मधील अंबेवेस ते भाजी मंडई रोडवरील ढाप्याचे काम निकृष्ट दर्जाचे झाल्याने ढापा फुटून त्यातील गज उघडे पडल्याने अपघाताचा धोका वाढला आहे. नगरपरिषदेने त्वरित अपघातास कारणीभूत ठरणाऱ्या सदरील ढाप्याची दुरुस्ती करावी अशी मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

परळी शहरातील अनेक रस्त्यांची कामे चालू आहेत. या रस्त्यांची कामे गुणवत्तापूर्ण व्हावीत याची जबाबदारी नगरपरिषद प्रशासनाची आहे मात्र अनेक कामे अर्धवट तर काही कामे निकृष्ट दर्जाची झाल्याने प्रशासनाचा गलथान कारभार उघडा पडत आहे. याचा नमुना म्हणजे प्रभाग क्रमांक ५ मधील अंबेवेस ते भाजी मार्केट रोडवरील ढापा मधोमध फुटल्याने त्यातील लोखंडी गज उघडे पडले आहेत. यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. या रस्त्याने गावभागातून मोंढ्याकडे जाण्याचा मार्ग असल्याने मोठ्या प्रमाणात वाहतूक या रस्त्यावरून होत असते. अनेक शाळेत जाणारे विद्यार्थी हाच रस्ता वापरतात. भाजीमंडई असल्याने शेतकऱ्यांना आपला शेतमाल नेण्यासाठी हाच रस्ता असल्याने वाहतूक करणाऱ्या वाहनांना या फुटलेल्या ढाप्यामुळे अडचण होत आहे.

दोन दिवसांपूर्वीच शहरातील स्नेह नगर भागात फुटलेल्या ढाप्यात गाय पडून गंभीर जखमी झाली होती. शहरातील अनेक रस्त्यांची कामे अर्धवट सोडलेली आहेत. दोन रस्त्यातील जोड न पूर्ण केल्याने अनेक वाहनचालकांना अचानकपणे ब्रेकचा वापर केल्याने अपघाताला सामोरे जावे लागले आहे. गणेशपार रोडवरील अनेक ठिकाणी जोड रस्ते तसेच सोडून दिल्याने खड्डे तयार झाले आहेत. या कामावर नगरपरिषद अभियंत्याचे कुठलेही लक्ष नसल्याने कामे अर्धवट सोडली जात आहेत. परळी नगरपरिषद प्रशासनाचा आंधळा कारभाराने नागरिकांच्या जीवाशी आला आहे. नगरपरिषद प्रशासन फक्त कार्यालयात बसूनच कारभार हाकत असल्याचा आरोप भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केला आहे.

गावभागातील जोडरस्त्यावरील खड्डे भरून घ्यावेत व अंबेवेस येथील फुटलेला ढापा त्वरित दुरुस्त करण्याची मागणी भाजपाचे अश्विन मोगरकर यांनी केली आहे.

---

## ना.अजितदादांच्या बैठकीत आ.क्षीरसागरांनी मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न मांडले

**प्रशासनाशी संबंधित आणि विकासाचे मुद्दे केले उपस्थित**

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ एप्रिल**

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली विविध विकास कामांची तसेच शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक जिल्हाधिकारी कार्यालयात बुधवारी (दि.२) रोजी पार पडली. या बैठकीत आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे प्रश्न ना.अजित दादांसमोर मांडले. यासोबतच प्रशासनाच्या संबंधित असलेले अनेक मुद्दे आ.क्षीरसागर यांनी उपस्थित केले.



बीड जिल्ह्यातील विकास कामे व शासकीय योजनांची जिल्हास्तरीय आढावा बैठक बुधवारी (दि.२) रोजी ना.अजित दादा पवार यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत ना.अजितदादांनी जिल्ह्यात पूर्ण झालेल्या आणि सुरू असलेल्या विकासकामांचा तसेच शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. याप्रसंगी बीड विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रतिनिधी या नात्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी बीड विधानसभा मतदारसंघातील महत्वाचे असलेले अनेक प्रश्न मंत्री महोदयांसमोर मांडले.

आ.संदीप क्षीरसागर यांनी मांडलेले मुद्दे (अतिमहत्वाचे)

एमआयडीसी भागात पोलीस चौकी उभारणी करणे.

नरेगा अंतर्गत जी अनावश्यक कामे झाली आहेत त्यातील कुशलची कामे प्रमाणात झालेली नाहीत. अनावश्यक मागणी केल्याने आज रोजी जी कामे आवश्यक आहेत ती करण्यासाठी अडचण निर्माण होत आहे.

राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ खरवंडी ते नवगण राजुरी रस्त्यावरील मौजे नवगण राजुरी, काटवटवाडी येथील संपादित प्रकरणात सुधारित निवाडा व निधी मागणी.

खरवंडी-ब्रह्मनाथ येळंब- आर्वी-खालापुरी-नवगण राजुरी राष्ट्रीय महामार्ग क्र.३६१ एफ ची सुधारणा करण्याबाबतचे काम गेल्या सात वर्षांपासून अपुर्ण आहे.

---

## श्री.खोलेश्वर प्राथमिक विद्यालयातील राजमाता प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या अध्यक्षापदी सौ.मंदाकिनी खडके तर सचिवपदी राजाभाऊ नांदगावकर यांची बिनविरोध निवड

**तभा वृत्तसेवा**
**अंबाजोगाई दि.३ एप्रिल**

श्री खोलेश्वर प्राथमिक विद्यालयात राजमाता प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळाची निवडणूक स.न. २०२५- ३० बिनविरोध संपन्न झाली. यात अध्यक्षापदी सौ.मंदाकिनी खडके तर उपाध्यक्षापदी राजश्री भारती, सचिवपदी राजाभाऊ नांदगावकर, कोषाध्यक्षपदी जगन्नाथ वाकडे, तर संचालकपदी नवनिर्वाचित संचालक देवकीबाई काळे,अनुजा गुडे, मंजुषा मुळे, परमेश्वर राठोड, पूजा मस्के यांची एकमताने निवड करण्यात आली.

राजमाता प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाची बैठक निवडणूक निर्णय अधिकारी आर.एस.पवार यांच्या उपस्थितीत दि. १७/ ३/ २०२५ रोजी संपन्न झाली. या बैठकीला सर्व नवनिर्वाचित संचालक मंडळ यांची उपस्थिती होती.



पतसंस्थेचे मार्गदर्शक तथा शालेय समितीचे अध्यक्ष उन्मेष दादा मातेकर,भा.शि.प्र.संस्थेचे मुख्य प्रशासकीय समन्वयक प्रा.चंद्रकांतराव मुळे, खोलेश्वर प्राथमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक शिवाजी हेंडगे, प्रगती वर्ग विभाग प्रमुख सौ.वर्षाताई मुंडे, केंद्र विभाग प्रमुख श्रीधर चौरे,पतसंस्थेचे माजी अध्यक्ष आप्पाराव यादव,पतसंस्थेच्या माजी उपाध्यक्षा सौ.गायत्रीताई संदीकर व पतसंस्थेचे माजी सर्व पदाधिकाऱ्यांनी नवनिर्वाचित संचालकांचा सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.आपल्या मनोगतात आप्पाराव यादव यांनी स्वयंपूर्ण सोसायटी कशी होईल याचा प्रयत्न करत शिक्षक सभासदांना केंद्रबिंदू मानून त्यांच्या हितासाठी पतसंस्थेच्या नवनिर्वाचित संचालक मंडळाने सदैव पतसंस्थेच्या उन्नती साठी कार्य करत राहावे असे सांगत त्यांना शुभेच्छा दिल्या.त्यांच्या निवडीबद्दल सर्व पतसंस्था पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन पतसंस्थेचे सर्व सभासद शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी केले.

---

## जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ एप्रिल**

बीड जिल्हयातील शासकीय कर्मचाऱ्यांविरूध्द प्राप्त होणा-या तक्रारीबाबत पाठपुरावा करण्यासाठी जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती स्थापन करण्यात आलेली आहे. सदर जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीची बैठक मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समिती बीड यांचे अध्यक्षतेखाली दि. ०७ एप्रिल २०२५ रोजी स. १०.३० वा. जिल्हाधिकारी कार्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

याअनुषंगाने नागरिकांनी शासकीय अधिकारी / कर्मचा-यांविरूध्द भ्रष्टाचारासंबंधी तक्रार असल्यास जिल्हास्तरीय भ्रष्टाचार निर्मुलन समितीसमोर व्यक्तीशः उपस्थित राहून पुराव्यासह लेखी स्वरूपात मांडाव्यात. सदर तक्रारीसोबत पुरावे जोडले गेले नसल्यास अशा तक्रारी समितीमध्ये घेतल्या जाणार नाहीत, असे सदस्य सचिव जि. भ्र. नि.स. तथा निवासी उपजिल्हाधिकारी यांनी कळविले आहे.

---

## जिल्हा क्रीडा प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षण घेण्यास सहभागी होणे बाबत आवाहन

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.३ एप्रिल**

बीड जिल्ह्यात विविध खेळांचा प्रचार व प्रसार होऊन जिल्ह्यातील खेळाडू राज्य, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी व्हावेत हा उद्देश ठेऊन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे राज्य शासनामार्फत नियुक्त तज्ञ क्रीडा मार्गदर्शक यांचे मार्फत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे जिल्हा परिषद कन्या प्रशाला, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड, जिल्हा क्रीडा संकुल, बीड, येथे सॉफ्टबॉल, बेसबॉल व मैदानी खेळाचे प्रशिक्षण केंद्र नियमीत सुरू आहे.

जिल्हा परिषद कन्या प्रशाळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बीड येथे (सकाळी ०७.०० ते ९.०० वाजेपर्यंत आणि जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे दुपारी ०४.३० ते ०७.०० वाजेपर्यंत सॉफ्टबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड, बेसबॉल खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार व मैदानी खेळाचे तज्ञ क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील हे प्रशिक्षण देत आहेत.बीड शहर व जिल्ह्यातील जास्तीत जास्त खेळाडूंनी सदर प्रशिक्षण केंद्राचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांनी केले आहे. अधिकच्या माहितीसाठी क्रीडा मार्गदर्शक सतीश राठोड (मो. ९९२३०१९३५३), क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार (मो. ९०७५४७६७९१) व क्रीडा मार्गदर्शक अविनाश पाटील (मो. ९६२३७८११२१) यांच्याशी संपर्क साधावा. असे जिल्हा क्रीडा अधिकारी, अरविंद विद्यागर यांचे वतीने कळविण्यात येत आहे.